लातूर
भूकंप
LATUR BHUKAMP
संपादक: अशोक चिंचोले

सांज दैनिक : गुरूवार – ६ जुलै २०२३
वर्ष – ३७ वे
अंक – १००
पाने – ४
E-Mail : dailybhukamp@gmail.com
RNI No. MAHMAR/2012/42770
☎ : -9422072823,251822
epaper.dainikbhukamp.com

किंमत २ रूपये


लातूर - तिरुपती
श्री. बालाजी दर्शनासहित
A/C SLEEPER | AIR SUSPENSION
जुलै महिन्याचे वेळापत्रक
जुलै महिन्याच्या तारखा
◂ दर मंगळवारी ▸
4 11 18 25
दुपारी २.०० वा.
अधिक माहितीसाठी संपर्क
88888 50441
88888 45404
विश्व ट्रॅव्हल्स लातूर.

# वंचितचा महाविकास आघाडीतील समावेश

# उद्धव ठाकरेंनी १५ दिवसात निर्णय घ्यावा

## –प्रकाश आंबेडकर

अकोला : वंचितच्या महाविकास आघाडी समावेशाबद्दल उद्धव ठाकरे यांनी १५ दिवसाच्या आत भूमिका स्पष्ट करावी, अन्यथा आम्ही आमचे निर्णय घ्यायला मोकळे आहोत, असे मत वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केले आहेत. ते आज अकोला येथे पत्रकार परिषदेत बोलत होते. आंबेडकरांचं भारत राष्ट्रीय समितीसोबत संभाव्य तिसऱ्या आघाडीच्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर आंबेडकरांचं हे विधान सूचक मानलं जातंय.

प्रकाश आंबेडकर म्हणाले, वंचितच्या महाविकास आघाडीतील समावेशाबद्दल उद्धव ठाकरेंनी पुढच्या १५ दिवसांत परिस्थिती स्पष्ट करावी. काँग्रेस आणि राष्ट्रवादीशी यासंदर्भात काय बोलणं झालंय हे स्पष्ट करावे आता निवडणुका जवळ आल्या आहेत. उद्धव ठाकरेंनी आता न्यायालयीन



लढाईच्या पुढे जात भविष्याच्या दृष्टीने निर्णय घेण्याची वेळ आली आहे. आमचा उद्धव ठाकरेंमुळे भ्रमनिरास झालेला नाही.

प्रकाश आंबेडकरांनी काँग्रेससोबतच्या सध्याच्या बोलणीवर 'थँक्यू' म्हणत बोलणं टाळलं.

शरद पवारांवर होत असलेल्या 'पेरलं तेच उगवलं' या आरोपांमध्ये तथ्य नाही. राजकारणात परिस्थितीनुरूप राजकीय तोडफोडीचे निर्णय घ्यावे लागतात. पवारांनी आतापर्यंत राजकारणासाठी जे केलंय ते आता त्यांच्यासंदर्भात घडले आहे. राजकारणातले 'रणछोडदास' सध्याच्या राजकीय घडामोडींमुळे समोर आलेत. चौकशांच्या छायेखालची लोकं अजित पवारांसोबत गेली, असेही प्रकाश आंबेडकर म्हणाले.

अजित पवारांनी कालच्या भाषणात काल शरद पवारांसंदर्भात केलेल्या गौप्यस्फोटांबद्दल आपण सातत्याने बोललो. अजित पवारांनी केलेले चारही गौप्यस्फोट त्यावर शिक्कामोर्तब करणारे आहे. वंचित आणि उद्धव ठाकरेंना सोबत लढायचं असल्यास लवकर निर्णय घ्यावा लागेल. यासाठी आमची तयारी पूर्ण झाली आहे, असे आंबेडकर यांनी सांगितले.

# पोलीस दलात खांदेपालट

## रेजीतवाड–औसा, देडे–अहमदपूर, अनंत्रे–रेणापूर, नरवटे–मुरूड

लातूर : लातूरचे पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी काल लातूर जिल्ह्यातील पोलीस ठाणे प्रभारीमध्ये मोठ्या प्रमाणात खांदेपालट केली आहे. त्यात सात पोलीस निरीक्षक, १३ सहाय्यक पोलीस निरीक्षक व ६ पोलीस उपनिरीक्षकांचा समावेश आहे.

बाहेर जिल्ह्यातून आलेले पोलीस निरीक्षक सुनील रेजीतवाड यांची बदली–औसा, सुधाकर देडे–अहमदपूर, विठ्ठल दराडे–शिरूर अनंतपाळ, साहेबराव नरवाडे–चाकूर, विष्णूकांत गुट्टे–देवणी, अशोक अनंत्रे–रेणापूर येथे बदली करण्यात आली आहे. चाकूरचे पोलीस निरीक्षक बालाजी मोहिते यांची बदली पोलीस कल्याण विभागात करण्यात आली आहे.

तर १३ सहाय्यक पोलीस निरीक्षकांपैकी बाळासाहेब नरवटे यांची मुरूड, भीमराव गायकवाड–वाढवणा, ज्ञानदेव सानप–गातेगाव पोलीस ठाण्याचे प्रभारी म्हणून बदली करण्यात आली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक नौशाद पाशा पठाण–गांधी चौक, मुरूडचे धनंजय ढोणे–जिविशा, गातेगावचे अशोक घारगे–विवेकानंद चौक, राहुलकुमार भोळ–औसा, व्यंकटेश्वर आलेवार–एमआयडीसी, दिपाली गिते–वाचक लातूर ग्रामीण, विठ्ठल दुरपडे–वाचक पोलीस अधीक्षक कार्यालय, श्रीमती क्रांती निर्मेळ–टीएमसी, सायबर सेलचे सुरज गायकवाड–वाचक अप्पर पोलीस अधीक्षक, बालाजी तोटेवाड–अहमदपूर येथे बदली करण्यात आली आहे. पोलीस उपनिरीक्षक व्यंकट कव्हाळे–भादा, जिलानी मानुल्ला–रेणापूर, शैलेश जाधव–उदगीर ग्रामीण, आयूब शेख–दहशतवाद विरोधी पथक, भगवान मोरे–लातूर ग्रामीण, तानाजी पाटील यांची शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे बदली करण्यात आली आहे.

# राज्यात पुढील ३ ते ४ दिवस

# जोरदार पावसाचा इशारा

पुणे : बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होत असल्यामुळे राज्यात पुढील ३ ते ४ दिवस जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. त्यामुळे काही ठिकाणी रेड अलर्ट, तर काही ठिकाणी अतिवृष्टीची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

गेल्या काही दिवसांपासून राज्यातील काही भागात दडी मारून बसलेला पाऊस पुन्हा एकदा सक्रीय झाला आहे. त्यामुळे रायगड आणि रत्नागिरीला रेड अलर्ट जारी, तर काही ठिकाणी अतिवृष्टीची शक्यता वर्तवण्यात आली असल्यामुळे नागरिकांनी सतर्क राहावे, असं आवाहन देखील हवामान विभागाने केले आहे.

मुंबईजवळ कमी दाबाचा पट्टा तयार होत असल्यामुळे आज मुंबई, ठाण्यात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तसेच नाशिक, पुणे, कोल्हापूर आणि साताऱ्यातील घाट माथ्यावर अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. तसेच पुढील दोन दिवस खंडाळा, लोणावळा, माथेरान, महाबळेश्र्वर, वाई आणि मुळशी येथे जोरदार पाऊस पडणार असून पुणे–मुंबई एक्स्प्रेस वे ओलांडताना खबरदारी घेण्याबाबत सांगण्यात आले आहे.

मराठवाडा आणि विदर्भातील बहुतांश जिल्ह्यात मुळधार पावसाची शक्यता असल्यामुळे हवामान विभागाकडून यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. मराठवाड्यातील मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना आणि परभणीसाठी यलो अलर्ट, उत्तर महाराष्ट्रातील जळगाव, धुळे आणि नंदूरबारमध्ये विजांसह पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे, तर उत्तर महाराष्ट्रातील जळगाव, धुळे आणि नंदूरबारमध्ये विजांसह पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. दरम्यान, पाऊस पुन्हा एकदा सक्रीय झाला असला तरी राज्यातील प्रमुख जलाशयांमध्ये सध्या फक्त २१ टक्केच पाणीसाठा आहे. मागील वर्षाच्या तुलनेत त्यामध्ये चार टक्क्यांची तूट आहे. केंद्रीय जल आयोगाच्या अहवालातून ही माहिती पुढे आली आहे.



## पिकाला मिळाले जीवदान

जोडजवळा भागात पहिल्या पावसात टोकन पद्धतीने शेतकऱ्यांनी पेरणी केल्यानंतर पावसाने बरेच दिवस उघडीप दिल्याने शेतकरी हवालदिल झाला होता. थोडे बहोत उगवलेले पिंक माना टाकू लागला मात्र गेल्या दोन दिवसात चागंला पाऊस पडल्याने पिकाला जीवदान मिळाले आहे. ( फोटो : प्रकाश कंकाळ)

# निवडणुकीतील राजकीय वाद

# अंगावर ट्रॅक्टर घालून खून

अहमदपूर : मौजे कौडगाव, ता. अहमदपूर येथील ग्रामपंचायत निवडणुकीचे जुने वादातून एका व्यक्तीच्या अंगावर ट्रॅक्टर घालून त्याचा खून केल्या प्रकरणी एका महिलेसह तिघा जणांविरूद्ध अहमदपूर पोलिसांत खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चंद्रशेखर बालाजी गंगाजी (वय ४०) रा. कौडगाव, ता. अहमदपूर हे ३ जुलै रोजी सायंकाळी सव्वासहा वाजण्याच्या सुमारास कुमठा ते ढोरसांगवी दरम्यान रोडने जात असताना अर्जुन संग्राम काचे रा. कौडगाव याने नंबर नसलेला ट्रॅक्टर चंद्रशेखर गंगाजी यांच्या अंगावर घालून त्याचा खून केला, अशी तक्रार मयताची पत्नी गिरीजा चंद्रशेखर गंगाजी यांनी दिल्यावरून अहमदपूर पोलिसांत अर्जून संग्राम काचे, संग्राम गोविंद काचे, मिराबाई संग्राम काचे यांच्या विरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गावातील ग्रामपंचायत निवडणुकीवरून या दोघांमध्ये वाद निर्माण झाला होता. त्या वादातून हा खून करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.

## शिर्डी येथे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयास मंजुरी

मुंबई : अहमदनगर जिल्ह्यातील शिर्डी येथे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय सुरू करण्यास राज्य सरकारने मान्यता दिल्याचा आदेश ५ जुलै रोजी काढण्यात आला आहे.

अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर यांच्या कार्यक्षेत्रात नेवासा, शेवगाव, पाथर्डी, अहमदनगर, पारनेर, श्रीगोंदा, कर्जत व जामखेड हे ८ तालुके तर अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय शिर्डी यांच्या कार्यक्षेत्रात कोपरगाव, रहाटा, सिद्रामपूर, संगमनेर, अकोले व राहुरी या सहा तालुक्यांचा समावेश आहे.

# हजर न होणाऱ्या तहसीलदारावर शिस्तभंगाची कारवाई होणार

मुंबई : मागील दिवसात वेगवेगळया आदेशान्वये राज्यातील तहसीलदार संवर्गातील पदस्थापनेचे आदेश काढून देखील अनेक तहसीलदार रूजू झाले नाहीत. ७ जुलै २०२३ च्या आत जे तहसीलदार रूजू होणार नाहीत. त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावेत, असे आदेश महसूल विभागाने विभागीय आयुक्तांना दिले आहेत.

गेल्या महिन्यात महाराष्ट्रातील अनेकांना तहसीलदार म्हणून वेगवेगळ्या तालुक्यात पदस्थापना दिली. असे असतानाही बरेच तहसीलदार आपल्या पदावर रूजू झाले नाहीत. हे लक्षात आल्यानंतर महसूल विभागाने राज्यातील विभागीय आयुक्तांच्या नावे आदेश काढले आहेत. पदस्थापना झालेले जे तहसीलदार ७ जुलैच्या पुर्वी आपआपल्या पदावर नियुक्त होणार नाहीत, अशांवर शिस्तभंगाची कारवाई करावी असे या आदेशात म्हटले आहे. ज्यांची बदली वेगवेगळ्या आदेशाने यापुर्वी झाली आहे. ते त्याचवेळी कार्यमुक्त झाले आहेत. पण अनेक तहसीलदार बदलीच्या ठिकाणी रूजू न होता इतरत्र पदस्थापना मिळावी यासाठी वेगवेगळ्या मार्गाने प्रयत्न करीत आहेत. ते प्रयत्न उघडकीस आल्यास ही कारवाई करण्याचा इशारा या आदेशात देण्यात आला आहे. ज्यांची बदली झाली आहे. पण, जे अद्याप रूजू झाले नाहीत. त्यांना उद्या शुक्रवारपर्यंतच रूजू होण्याची संधी आहे. अन्यथा त्यांना शिस्तभंगाच्या कारवाईला सामोरे जावे लागणार आहे.

# स्वत: व साहेबांसाठी लाच घेताना पोलीस उपनिरीक्षक जाळ्यात

लातूर : देवणी पोलीस ठाणे येथे कार्यरत असलेले पोलीस उपनिरीक्षक मुजाहेद खुर्शीद शेख यास स्वत:साठी व साहेबासाठी म्हणून ८ हजार रूपयांची लाच स्वीकारताना काल लातूरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने उदगीर येथे रंगेहात पकडले आहे.

मुजाहेद खुर्शीद शेख हे देवणी पोलीस ठाण्यात पोलीस उपनिरीक्षक वर्ग–२ या पदावर कार्यरत आहेत. येथे कार्यरत असताना एका नागरिकाच्या विरोधात दुसऱ्या नागरिकाने काळी माती चोरल्या प्रकरणी तक्रार अर्ज दिला. हा तक्रारी अर्ज निकाली काढण्यासाठी व भविष्यात त्या व्यक्तीकडून अशा तक्रारी येत राहिल्या तर त्या थोपविण्यासाठी व वेळोवेळी कायदेशीर कारवाईपासून बचाव करण्यासाठी म्हणून पोलीस उपनिरीक्षक शेख याने त्या तक्रारदाराकडे सुरूवातीला सोन्याच्या बिस्कीटाची मागणी केली. सोन्याचे बिस्कीट व स्वत:साठी ३ हजार रूपये आणि पोलीस निरीक्षक याच्यासाठी ५ हजार रूपयाच्या लाचेची मागणी केली. सदर ८ हजार रूपयांची लाच ५ जुलै रोजी ४ वाजण्याच्या सुमारास उदगीर येथील एका हॉटेलच्या समोर स्वीकारत असताना लातूरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पोलीस उपनिरीक्षकास रंगेहात पकडले. या प्रकरणी उदगीर शहर पोलिसांत त्या पोलीस उपनिरीक्षकाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लातूर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक पंडीत रेजीतवाड, पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली, अन्वर मुजावर व पोलीस कर्मचाऱ्यांनी नांदेड परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक डॉ. राजकुमार शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई केली.

## त्यांच्या मते....

▣ **आमच्या विठ्ठलाला बडव्यांनी घेरलं आहे.**
–ना. छगन भुजबळ

- - - - - - - - - -

☛ यालाच म्हणायचं बडव्यांच्या उलट्या बोंबा

▣ **पक्षाचं घड्याळ चिन्ह जाणार नाही, जाऊ देणार नाही.**
–शरद पवार

- - - - - - - - - -

☛ घड्याळ फिरलं की घड्याळाचे काटेही फिरतात

▣ **साहेब तुम्ही शतायुषी व्हा, आम्हाला आशीर्वाद द्या.**
–अजितदादा पवार

- - - - - - - - - -

☛ आतापर्यंत दिले ते काय होते.

▣ **माझ्या बापाबद्दल बोलायचं नाही, मी मुलगी आहे. संघर्षाची वेळ येते तेंव्हा ती पदर खोचून अहिल्या, ताराराणी व जिजाऊ होते.**
–सुप्रियाताई सुळे

- - - - - - - - - -

☛ पदर खोचायची वेळ यापुर्वी अनेकवेळा येऊन गेली.

# 'स्वच्छ सर्वेक्षण' ग्रामीण अंतर्गत जिल्ह्यातील १५ गावांचे राज्यस्तरीय मुल्यांकन

लातूर, ता. ६ : स्वच्छ भारत मिशन ग्रामीण अंतर्गत जिल्ह्यात केंद्र शासनामार्फत स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०१८ पासून राबविण्यात येत आहे. या मध्ये २०२३ मध्ये जिल्ह्यातील १५ ग्रामपंचायतीची तपासणीस राज्यस्तरीय कमिटी मार्फत मुल्यांकन करण्यात येत आहे.अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल यांनी दिली

केंद्र शासनामार्फत सन २०१८ पासून दरवर्षी स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण राबविण्यात येते. त्या दृष्टीने ५, ६,७ जुलै रोजी औसा तालुक्यातील उटी बु., दावतपुर, माळकोंडजी, भादा. निलंगा तालुक्यातील हंद्राळ, लातूर तालुक्यातील कव्हा, गंगापूर.

६ जुलै रोजी जळकोट तालुक्यातील ढोरसांगवी, शिरुर अनंतपाळ – जवळगा, थेरगाव, चाकूर – सुगाव, अहमदपूर तालुक्यातील वळसांगवी. ७ जुलै रोजी रेणापूर तालुक्यातील दवनगाव, पोहरेगाव, खरोळा या गावांचे मुल्यांकन करण्यात येत आहे.

या वर्षापासून सदर अभियानाचे स्वरूप बदलले असून या मध्ये ओडीएफ प्लस मॉडेल गाव हा मुख्य उद्देश ठेवण्यात आला आहे. या सर्वेक्षणाअंतर्गत ग्रामपंचायतींची तपासणी तीन गटात करण्यात आली आहे. या मध्ये २००० लोकसंख्येपर्यंत, २००० ते ५००० लोकसंख्येपर्यंत व व ५००० चे वरील लोकसंख्येपर्यंत असा निकष ठेण्यात आला आहे. केंद्र शासनाकडून एक प्रश्नावली तयार करण्यात आली होती. मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल व पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी मोहन अभंगे जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक उध्दव फड यांचे सनियंत्रणात तालुकास्तरावर सर्व गावांचे साध्यस्थितीबाबत प्रथम व अंतिम स्वयंममूल्याकन करून् ऑनलाईन द्वारे प्रश्नावली भरण्यात आली. त्या नुसार प्रत्येक तालुक्यातून उत्कृष्ट ग्रामपंचायती जिल्हास्तरावर सादर करण्यात आल्या. जिल्हा स्तरावरून १५ उत्कृष्ट ग्रामपंचायती राज्यस्तरीय स्पर्धेसाठी नामनिर्देशीत करण्यात आल्या. या ग्रामपंचायतींची सातारा जिल्हा वतीने राज्यस्तरीय तपासणी पथकामार्फत करण्यात येत आहे यात अजय राऊत, राजेश इंगळे,धनाजी पाटील,व उध्दव फड यात आहेत.या तपासणी मधुन राज्यातून २७ ग्रामपंचायती केंद्रस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरणार आहे.

या तपासणीत प्रत्येक गावात मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे.अशी माहिती जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक उध्दव फड, उध्दव फड यांनी दिली आहे.

# निवृत्ती वेतन महागाई भत्त्यात ४२ टक्क्यापर्यंत वाढ

लातूर : निवृत्ती वेतनधारक/ कुटुंब निवृत्तीधारक यांच्या महागाई भत्ता वाढीचा दर ३८ टक्क्यांवरून ४२ टक्क्यापर्यंत वाढविण्यात आला असून त्याचा अंमल १ जानेवारी २०२३ पासून करण्यात येणार असल्याचे परिपत्रक राज्य शासनाच्या वतीने काढण्यात आले आहे.

निवृत्ती वेतनधारक/ कुटुंब निवृत्ती वेतनधारक यांना मुळ निवृत्तीवेतनावर महागाई वाढीव दर ३८ टक्के देण्यात येत होता. तो आता ४२ टक्क्यांपर्यंत वाढविण्यात आला आहे. याची अंमलबजावणी १ जानेवारी २०२३ पासून करण्यात येत आहे. दरम्यानचा महागाई वाढ दर, थकबाकी जुलै २०२३ या महिन्याच्या निवृत्ती वेतनासोबत रोखीने द्यावा, असे या परिपत्रकात म्हटले आहे. निवृत्ती वेतनधारकांत पात्र असलेले राज्य शासनाचे कर्मचारी, जिल्हा परिषदेचे कर्मचारी, मान्यता व अनुदान प्राप्त शैक्षणीक संस्था, कृषी व कृषीत्तेर विद्यापीठ यातील अधिकारी, कर्मचारी यांचा समावेश आहे.




# धीरूभाई अंबानींना माहित होते 'मातीतून' पैसे कसे कमवायचे

देशातील सर्वात मोठी कंपनी रिलायन्स इंडस्ट्रीजचे संस्थापक धीरूभाई अंबानी यांची आज पुण्यतिथी आहे. १९५८ मध्ये धीरूभाईंनी ज्या व्यवसायाची स्थापना केली, त्या रिलायन्सने भारतातील व्यवसाय करण्याचे अनेक नियम आणि कायदे बदलले. तसे, धीरूभाईंच्या जीवनाशी संबंधित एक अनोखा किस्सा आहे, जेव्हा त्यांना किरकोळ 'माती' विकून मोठी रक्कम मिळाली. कदाचित त्यांच्या व्यवसायाचे हे कौशल्य रिलायन्सला इतके मोठे करण्यात मदत करत असावे.

धीरूभाई अंबानी यांनी भारतात व्यवसाय सुरू करण्यापूर्वी काही दिवस येमेनमध्ये काम केले. आखाती देशात घालवलेल्या काळात, जिथे त्यांनी व्यवसाय करण्याच्या अनेक युक्त्या शिकल्या, तिथे त्यांना व्यवसायाच्या अनेक संधीही मिळाल्या. 'माती विकून' पैसे कमावण्याची त्यांची कहाणीही आखाती देशाशी संबंधित आहे.

वास्तविक, एका अरब देशाच्या शेखला त्याच्या बागेत गुलाब वाढवायचे होते. त्यासाठी त्यांना सुपीक मातीची गरज होती. धीरूभाई अंबानींना याची माहिती मिळताच त्यांनी भारतातून ही माती आपल्या संपर्कातून अरब शेखला पाठवली. त्या बदल्यात, अरेबियाच्या शेखाने त्यांना कमालीची किंमत दिली. या घटनेनंतर काही काळातच धीरूभाईंनी कपड्यांचा व्यवसाय सुरू केला आणि स्वतःचा ब्रँड 'विमल' बनवला.

आम्ही तुम्हाला सांगतो की जेव्हा धीरूभाई अंबानी यांनी १९५८ मध्ये व्यवसाय सुरू केला, तेव्हा त्यांनी केवळ ५०० रुपयांच्या गुंतवणुकीने हे काम सुरू केले होते. त्यांनी मुंबईत भाड्याचे कार्यालय घेतले, ज्यात त्यावेळी फक्त एक टेबल आणि ३ खुर्च्या होत्या. मग ते प्रामुख्याने मसाल्यांचा व्यापार करत असे आणि त्यांच्या कंपनीचे नाव रिलायन्स कॉमर्स कॉर्पोरेशन असे होते. त्यानंतर १९६६ मध्ये त्यांनी गुजरातमधील अहमदाबाद येथे कापड गिरणी सुरू केली. यासह रिलायन्स कॉमर्स कॉर्पोरेशन रिलायन्स टेक्सटाइल बनले. या घटनेनंतर सुमारे एक दशकानंतर १९७७ मध्ये रिलायन्स इंडस्ट्रीजला त्यांचे सध्याचे नाव मिळाले. तोपर्यंत धीरूभाई अंबानी पेट्रोकेमिकल्सच्या व्यवसायात उतरले होते. १९७७ मध्ये रिलायन्स इंडस्ट्रीजने देशातील पहिला IPO लाँच केला. या घटनेने देशातील शेअर बाजाराचा विस्तार झाला. यासह रिलायन्स इंडस्ट्रीजने आजचे स्थान गाठण्याचा प्रवास सुरू केला.

# बॉलीवूडमधील अनेक सेलिब्रिटीजचे 'हे' आहे फेवरेट डेस्टीनेशन

भंडारदरा हे गाव भारताच्या महाराष्ट्र राज्यातील अहमदनगर जिल्ह्याच्या अकोले तालुक्यात आहे. येथे भंडारदरा धरण आहे. या गावाजवळ जलविद्युत केंद्र आहे. भंडारदरा हे प्रवरा नदीच्या काठी वसलेले एक आदिवासी कोळी महादेव जमातीचे गाव आहे. ते निसर्गसौंदर्याने नटलेले स्थान असून अनेक धबधबे, डोंगरकडे, जलाशय, हिरवी झाडे, शुद्ध आणि थंड हवा हे इथल्या मूळच्या सौंदर्यात अजूनच भर टाकतात.
भंडारदरा धरण आणि रंधा धबधबा हे पर्यटकांचे येथील मुख्य आकर्षणाचे केंद्रबिंदू आहेत.
भंडारदरा येथे अनेक नयनरम्य स्थळे आहेत. भंडारदरा धरणाचे मूळ नाव विल्सन डॅम असून त्याच्या जलाशयास आर्थर लेक असे म्हटले जाते. हे प्रवरा नदीवर ब्रिटिशांच्या काळात बांधलेले धरण आहे. प्रवरा नदीचा उगम जवळच्या रतनगडावर झालेला आहे. प्रवरा नदीचे पाणी हे अमृतासमान आहे म्हणून नदीला अमृतवाहिनी असे म्हटले जाते.



मुख्य आकर्षण : भंडारदरा हे एक अतिशय वेगाने लोकप्रिय होत चाललेले पर्यटनस्थळ असुन दरवर्षी विविध ठिकाणांहुन येथे भेट देणारांची संख्या वाढत आहे. बॉलीवूडमधील अनेक दिग्दर्शकांचे हे एक आवडते स्थान असुन कित्येक प्रसिद्ध हिंदी/मराठी चित्रपटांचे चित्रीकरण याच परिसरात झालेले आहे. (कटी पतंग, हीना, राम तेरी गंगा मैली, राजू चाचा, आणि देऊळ)
कळसूबाई : भंडारदरा परिसरातच कळसूबाई हे महाराष्ट्रातील सह्याद्रीचे सर्वाधिक उंच शिखर असून समुद्रसपाटीपासून त्याची उंची सुमारे १६४६ मीटर आहे. शिखरावर कळसुबाई देवीचे मंदीर आहे. कळसुबाई ही आदिवासी कोळी महादेव तसेच वारली, कातकरी या जमातींची कुलदेवी आहे. सध्या वाढत्या बदलामुळे येथे देखील नवरात्रात दररोज हजारो भक्तगण देवीच्या दर्शनासाठी येतात. शिखरावरून दिसणारे परिसराचे दृश्य अतिशय मनमोहक असे आहे.
अम्ब्रेला फॉल : विल्सन डॅमवरच एक मोठा गोलाकार धबधबा असून त्याच्या छत्रीसारख्या वैशिष्ट्यपूर्ण आकारामुळे त्याला 'अम्ब्रेला फॉल' असे म्हणतात. धरणाचे आवर्तन सुरू असताना खुप दुरवरूनही अम्ब्रेला फॉल बघता येऊ शकतो. मात्र हा अम्ब्रेला फॉल केवळ जुलै ते ऑक्टोबर महिन्यांतच पहायला मिळतो.
रंधा फॉल : शेंडी या गावापासून १० किलोमीटर अंतरावर रंधा या गावात एक विशाल धबधबा असून तो गावाच्या नावावरूनच रंधा फॉल म्हणून प्रसिद्ध आहे. सध्या हा धबधबा त्यावर असलेल्या जलविद्युत प्रकल्पामुळे फक्त पावसाळ्यातच पहायला मिळतो. पावसाळ्यात हा धबधबा अतिशय रौद्र रूप धारण करतो. पावसाळ्यात मुख्य धबधब्याच्या उजव्या बाजुने अजुन एक धबधबा पहायला मिळतो. दोन्ही धबधबे पूर्ण क्षमतेने वाहत असताना पाहणे हा एक रोमांचित करणारा अनुभव आहे.
रतनवाडी : भंडारदऱ्याहुन बोटिंगचा आनंद घेत रतनवाडी येथे जाता येते. रतनवाडी येथे आदिवासी कोळी महादेव जमातीचे कुलक अमृतेश्र्वराचे पुरातन हेमाडपंथी मंदीर आहे. या मंदीरावरील दगडी नक्षीकाम अत्यंत सुबक आणि देखणे असुन त्यात मुख्य गाभाऱ्यात एक शिवलिंग आहे, पावसाळ्यात हे शिवलिंग पूर्णतः पाण्यामध्ये बुडालेले असते. रतनवाडी परीसरात अनेक धबधबे असुन गळ्यातील हारासारखा दिसणारा 'नेकलेस फॉल' हा विशेष लोकप्रिय आहे.
घाटघर : शेंडी येथुन पश्र्चिमेकडे २२ किमीवर घाटघर हे निसर्गसौंदर्याने नटलेले एक गाव आहे. भंडारदरा धरणाच्या कडेकडेने घाटघरपर्यंत करावयाचा प्रवास अतिशय आनंददायी आहे. घाटघर गावचा कोकणकडा अतिशय प्रसिद्ध असुन इथुन कोकण आणि सह्याद्री पर्वताचे विलोभनीय दृश्य पहायला मिळते. तसेच येथे आदिवासी कोळी महादेव जमातीच्या कुलदेवीचे देखील मंदिर आहे तिचे नाव घाटन देवी आहे. याच नावावरून गावाचे नाव घाटघर असे पडले आहे. इथे अनेक धबधबे असुन पावसाळ्यात हा संपूर्ण परिसर धुक्यात हरविलेला असतो. घाटघरला खुप पाऊस पडतो म्हणुन यास नगर जिल्ह्याचे चेरापुंजी असे म्हंटले जाते.

# महिला सन्मान योजना आणि अमृत योजनेमुळे...एस. टी. वेगात....!!



महाराष्ट्र शासनाच्या अनेक योजना लोक कल्याणकारी ठरतात... हा आज पर्यंतचा इतिहास आहे. आता यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ७५ वर्षाच्या पुढच्या नागरिकांसाठी एस. टी. महामंडळाच्या बसमध्ये अमृत मोफत प्रवास योजना आणि महिलांसाठी प्रवास भाड्यात ५० टक्के सवलत असलेली महिला सन्मान योजना सुरु केली.

लातूर विभागात एस. टी. महामंडळाला अमृत योजनेंतर्गत एप्रिल - २०२३ मध्ये १३ लाख ६९ हजार १५२ एवढ्या ज्येष्ठ नागरिकांनी प्रवास केला त्यातून ६०७.०५ लाख एवढे उत्पन्न मिळाले, तर माहे मे या महिन्यात १५ लाख ३ हजार ९४९ एवढ्या जेष्ठ नागरिकांनी प्रवास केला यातून ६८८.६७ लाख एवढे उत्पन्न झाले. माहे जूनमध्ये १४ लाख ७५ हजार ५२५ एवढे जेष्ठ आणि त्यातून मिळालेले उत्पन्न ७०७.०८ लाख एवढे आहे.

तर महिला सन्मान योजनेंतर्गत प्रवास भाड्यातील ५० टक्के सवलतीमुळे मोठ्या प्रमाणात महिला प्रवाशांची संख्या वाढली असून लातूर विभागात एप्रिल - २०२३ मध्ये १४ लाख १० हजार ५२९ एवढ्या महिला प्रवाशांनी या योजनेचा लाभ घेतला. यातून ३९३.१६ लाख उत्पन्न मिळाले तर माहे मे महिन्यामध्ये ही महिला प्रवाशांची संख्या वाढून ती १८ लाख १ हजार ६ हजार २१ झाली त्यातून ५६४.८५ लाख उत्पन्न झाले. माहे जून महिन्यामध्ये हा आकडा १५ लाख ८२ हजार ७१६ एवढ्या महिलांनी प्रवास केला त्यातून ४५८.९८ लाख एवढे उत्पन्न लातूर विभागाला मिळाल्याचे लातूर विभाग नियंत्रक अश्र्वजीत अशोक जानराव यांनी सांगितले.

या योजनेचा नेमका काय फायदा झाला हे थेट बस स्थानकात जाऊन लाभधारकांना प्रतिक्रिया विचारल्या... जेष्ठ नागरिकांच्या प्रतिक्रिया

जेष्ठ नागरिकांसाठी एस.टी. महामंडळाने जी सवलत दिली आहे, त्यामुळे मी पंढरपूर येथील विठ्ठलाचे दर्शनासाठी जावू शकलो तसेच मला सोलापूर येथे नियमित उपचारासाठी दवाखान्यात जाण्यासाठी इतर कोणालाही आर्थिक मदत मागण्याची वेळ आली नाही अशी प्रतिक्रिया पंडित हरीभाऊ मोटाडे, रा. दर्जीबारेगाव ता. रेणापूर जि. लातूर यांनी व्यक्त केली.

तर लातूर तालुक्यातील सावरगावचे राहिवाशी सुर्यकांत व्यंकटराव शिंदे म्हणाले, मी एक वारकरी आहे, या प्रवासाची सवलत दिल्यामुळे मला पंढरपूर जाण्यासाठी तसेच महाराष्ट्रातील देवदेवस्थान तसेच मुलां-बाळांकडे, पाहूण्यांकडे जाण्यासाठी, महाराज म्हणून मी ही जनसेवा करीत असतो. इतर गावो-गावी जाण्यासाठी चांगली सोय झाली. सरकाने ही जी योजना काढली आहे,ती चांगली असून यातून वयोवृद्धाची सेवा होत आहे. त्यासाठी मी महाराष्ट्र शासनाचे आभार मानतो.

माझं कुटंब हे पुणे येथे राहते..त्याठिकाणी मी एस टी मोफत झाल्यापासून नियमित जातो. तसेच माझ्या मुलींकडे जाण्याची सोय झाली आहे. गावाकडे येण्या-जाण्यासाठी तसेच ज्योतिबा (कोल्हापूर) , पंढरपूरच्या यात्राला जाऊन आलो. या योजनेचा मी पुरेपूर लाभ घेत असल्याची प्रतिक्रिया श्री. निवृत्ती लिंबाजी पाखरे, हासेगाव ता. लातूर यांनी दिली.

महिला सन्मान योजनेच्या लाभार्थी महिलांच्या प्रतिक्रिया

मला तीन मुली आहेत एक कोल्हापूर, एक मुंबई, आणि एक पुण्यात राहते... त्या तिघीकडे या सवलतीमुळे मी नियमित जाते. ही सवलत दिल्यामुळे अर्ध्या तिकिटात या सर्व ठिकाणी भेटून येते याचे समाधान असल्याची प्रतिक्रिया लातूर येथे सिध्देश्वर चौक येथे राहणाऱ्या श्रीमती सुषमा लोखंडे यांनी दिली.

लातूर मध्ये नर्सिंगची शिक्षण घेणाऱ्या प्रिया सुतार बालाजी या विद्यार्थिनीने.. पूर्वी कधी तरी जायचे पण आता या ५० टक्के सवलतीमुळे गावांकडे किंवा पाहुण्यांकडे जात असते. सवलत दिल्याने उर्वरित ५० टक्के रक्कम मी माझ्या शिक्षणासाठी वापरत आहे.

दुसऱ्या एक ज्वेलरीचा व्यवसाय करणाऱ्या श्रीमती सोनाली पंकज कोटेजा म्हणाल्या, मी ज्वेलरीचा उद्योग करते. ज्वेलरी एग्जीबिशनसाठी अहमदनगर, बीड, जालना येथे एस.टी. महामंडळाने ५० टक्के प्रवास सवलत दिल्याने मी जावू शकले. यातून जी ५० टक्के रक्कम बचत होणार आहे, ती मी माझ्या उद्योगात लावत आहे.

'मी मेमसाब या ठिकाणी काम करीत असते. मला माझ्या आईकडे ( नांदेड जिल्ह्यात) जाण्यासाठी एस.टी. सवलत मिळाल्याने मी आईकडे किमान दोन वेळा जावू शकले. एस.टी. महामंडळाची ५० टक्के सवलत मिळाल्याने हे शक्य झाले आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाचे आभार मानते लातूर मध्ये राहणाऱ्या श्रीमती मीना विकास कांबळे यांनी या प्रतिक्रिया दिल्या.

श्रीमती वर्षा शांतीनाथ दुरुगकर, शिरुर अनंतपाळ यांनी मला एस.टी. महामंडळाची ५० टक्के सवलत मिळाल्याने लातूर येथे नियमित दवाखान्यात येवू शकते. त्यामुळे मी वेळेच्या वेळेला दवाखान्यात जावून आरोग्याची काळजी घेवू शकत असल्याची प्रतिक्रिया दिली.

या सर्व प्रतिक्रिया अत्यंत बोलक्या होत्या.महिलांना अर्धे भाडे असल्यामुळे माहेर मुलीकडे जाणे, पाहूणे तसेच छोटे मोठे व्यवसाय करणाऱ्या महिलांना याचा मोठा लाभ होत आहे आणि ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास असल्यामुळे दवाखान्यात येण्यासाठी ,देव देवस्थान दर्शनाला जाण्यासाठी आर्थिक भार नसल्यामुळे सोपे झाले आहे. अनेकांनी परवाची पंढरपूरची आषाढी यात्रा बसनी केल्याचे सांगितले. या ज्येष्ठासाठीच्या अमृत मोफत प्रवास योजनेमुळे एस. टी.महामंडळाची प्रवासी वाहतुक बस पूर्ण क्षमतेनी भरून जातात तसेच शासनाकडून मिळणाऱ्या परताव्यामुळे एस. टी. चे उत्पन्न वाढते आहे. सर्व अर्थानी ह्या योजना लोकोपयोगी ठरत असल्याचे चित्र आहे.

**- युवराज पाटील**
जिल्हा माहिती अधिकारी,
लातूर




# भारतातील ही ठिकाणे तुम्हाला बाहेरच्या देशांची आठवण करून देतील

ही ठिकाणे परदेशाप्रमाणे आनंद देतील

भारतात अशी अनेक ठिकाणे आहेत जिथून तुम्हाला परदेशासारखेच दृश्य पाहायला मिळते. या ठिकाणांना भेटी दिल्यास तुम्ही केवळ भारतातच आहात असे वाटणार नाही, तर परदेशाप्रमाणे आनंदही घ्याल.

प्रवासाची आवड असलेले लोक प्रवासासाठी नेहमीच नवीन गोष्टी शोधत असतात. देशाच्या कोणत्या ना कोणत्या कोपऱ्यात त्यांना नेहमीच सुंदर दृश्य पाहायला मिळते. तुम्ही भारतातील अनेक ठिकाणांना भेट दिली आहे आणि आता तुम्ही परदेशात जाण्याचा विचार करत आहात, पण लाखोंचा खर्च करण्याचा विचार करून तुमचे मन हरवत आहे, मग काळजी करण्याची गरज नाही.

भारतात अशी अनेक ठिकाणे आहेत जिथून तुम्हाला परदेशासारखेच दृश्य पाहायला मिळते. या ठिकाणांना भेटी दिल्यास तुम्ही केवळ भारतातच आहात असे वाटणार नाही, तर परदेशाप्रमाणे आनंदही घ्याल.

अंदमान : समुद्रकिनाऱ्याचे दृश्य पाहण्यासाठी आणि आनंद घेण्यासाठी मालदीवमध्ये जाण्याचे लोकांचे स्वप्न आहे. पण कमी बजेटमुळे तुम्ही मालदीवला जाऊ शकत नसाल तर काळजी करण्याची गरज नाही. अंदमानमधील मालदीव सारखी समुद्रकिना-याची दृश्ये तुम्ही पाहू शकता. अंदमानमध्ये अनेक समुद्रकिनारे आहेत. तिथले निळे पाणी पाहून मन प्रसन्न होते. बरेच लोक हनिमूनसाठी अंदमानला जातात.

गुलमर्ग : काश्मीरचा गुलमर्ग स्वित्झर्लंडपेक्षा कमी नाही. अनेकांना स्वित्झर्लंडला जायचे असते पण तिकीट जास्त असल्याने ते मन मारून घेतात. अशा परिस्थितीत काळजी करण्याची गरज नाही. गुलमर्गमध्ये तुम्हाला स्वित्झर्लंडसारखी प्रेक्षणीय स्थळे पाहायला मिळतील. तेथे तुम्ही स्वित्झर्लंडप्रमाणे आनंद घेऊ शकता.

कुर्ग : कुर्गला भारताचे स्कॉटलंड म्हणतात. हे एक अतिशय सुंदर हिल स्टेशन आहे. जिथे अनेक धबधबे देखील आहेत. ज्याचा तुम्ही आनंद घेऊ शकता आणि हे ठिकाण बजेट फ्रेंडली देखील आहे.

पाँडिचेरी : पाँडिचेरी हे समुद्राकाठी वसलेले एक सुंदर छोटे शहर आहे. मिनी फ्रान्स म्हणूनही ओळखले जाते. ते फार गर्दीचे ठिकाण नाही. येथील जेवण अप्रतिम आहे. इथले खाद्य आणि संस्कृती लोकांना आवडते. जर तुम्हाला फ्रेंच व्हाइब्सचा आनंद घ्यायचा असेल तर पाँडिचेरीला भेट द्यावी.

लडाख : प्रत्येकाला डोंगरावर जाण्याची आवड असते. प्रत्येकाला ऑस्ट्रेलियाच्या उंच पर्वतांवर जायचे असते. पण आता तुम्ही तिथे जाऊ शकत नसाल तर काळजी करू नका. लडाख देखील ऑस्ट्रेलियापेक्षा कमी नाही. ऑस्ट्रेलियात तुम्ही तितकीच मजा कराल. कमी बजेटमध्ये तुम्ही ऑस्ट्रेलियाचा आनंद घेऊ शकता.

भारतात अशी अनेक ठिकाणे आहेत जी परदेशापेक्षा कमी नाहीत. जिथे तुम्ही परदेशाप्रमाणे आनंद घेऊ शकता. यासोबतच तुमचे कामही कमी बजेटमध्ये होईल. दैनंदिन गर्दीपासून दूर, यावेळी या ठिकाणांना भेट देण्याची योजना करा. ते तुम्हाला शांती देतील आणि तुम्ही तुमच्या जोडीदारासोबतही त्यांचा आनंद घेऊ शकता.

# पृथ्वीचा घडा कलंडतोय!

पृथ्वीचा समतोल राखण्यासाठी भूगर्भातील जलाशय महत्त्वाचे आहेत. मानवाने जमिनीखालून इतके भूजल उपसले आहे की त्यामुळे पृथ्वीचा अक्ष अधिक झुकायला लागला आहे आणि हा बदल उत्तर ध्रुवाचे भौतिकरित्या स्थलांतर करण्यासाठी लक्षणीय आहे. ध्रुवीय बर्फ वर्षाला ४.३६ सेंटीमीटरने पुढे सरकत आहे. प्रोफेसर सेओ यांच्या गणनेनुसार १९९३ ते २०१० या कालावधीत दोन ट्रिलियन टनांहून अधिक भूजल उपसले गेले आहे आणि समुद्राची पातळी ६.२४ मिलीमीटरने वाढली आहे. पृथ्वीचे प्रचंड वस्तुमान असूनही भूजल कमी केल्याने पृथ्वीचा अक्षीय झुकाव बदलत आहे.

पृथ्वीचा अक्ष हा सुमारे साडेतेवीस अंशाने कललेला आहे हे आपण लहानपणापासून शिकत आलो आहोत. हा अक्ष झुकलेला आहे म्हणूनच पृथ्वीवर ऋतू आणि हंगामामधील प्रचंड विविधता आपल्याला अनुभवायला मिळते. हा अक्ष कायम स्थिर असतो का? तर नाही! याची एक भोवर्यासारखी फिरणारी गती आहे जिला परांचन गती म्हणतात आणि यामुळे आपला उत्तर अक्ष हा थोडा थोडा सरकत असतो. हे त्याचे सरकण्याचे चक्र पूर्ण व्हायला सुमारे २६००० वर्षे लागतात. ही अक्ष सरकण्याची प्रक्रिया नैसर्गिक आहे आणि अक्ष सरकण्याने पृथ्वीवर अनेक परिणाम होतात. सामान्य परिस्थितीत कोणत्याही मानवी हस्तक्षेपाशिवाय महासागर, वातावरण आणि भू-वस्तुमान यांना म्हणजेच पृथ्वीला तिची जलचक्रं नैसर्गिकरित्या कंप निर्माण करतात जे भोवर्याच्या गतीप्रमाणे असतात, परंतु काळाच्या तुलनेत हे बदल लक्षात येण्याजोगे नसतात.


सेऊल नॅशनल युनिव्हर्सिटीचे भूभौतिकशास्त्रज्ञ की-वेन सेओ यांनी केलेले संशोधन नुकतेच प्रसिद्ध झाले आहे. त्यानुसार पृथ्वीवर घडणार्या हवामान बदलासारख्या घटनांमुळेदेखील अक्ष झुकतो आणि यातील मुख्य घटना म्हणजे मानवाने केलेला जमिनीखालील पाण्याचा अतिउपसा.

पृथ्वीचा समतोल राखण्यासाठी भूगर्भातील जलाशय महत्त्वाचे आहेत. मानवाने जमिनीखालून इतके भूजल उपसले आहे की त्यामुळे पृथ्वीचा अक्ष अधिक झुकायला लागला आहे आणि हा बदल उत्तर ध्रुवाचे भौतिकरित्या स्थलांतर करण्यासाठी लक्षणीय आहे. ध्रुवीय बर्फ वर्षाला ४.३६ सेंटीमीटरने पुढे सरकत आहे. प्रोफेसर सेओ यांच्या गणनेनुसार १९९३ ते २०१० या कालावधीत दोन ट्रिलियन टनांहून अधिक भूजल उपसले गेले आहेत आणि समुद्राची पातळी ६.२४ मिलीमीटरने वाढली आहे. पृथ्वीचे प्रचंड वस्तुमान असूनही भूजल कमी केल्याने पृथ्वीचा अक्षीय झुकाव बदलत आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागाखालील २.१५ ट्रिलियन टन भूजलाचे पुनर्वितरण प्रामुख्याने पश्र्चिम उत्तर अमेरिका आणि वायव्य भारतातून होते. आश्चर्य म्हणजे अवघ्या १७ वर्षांमध्ये अक्षाचा झुकाव ७८.५ सेंटीमीटर इतका झाला आहे.

भूजलाचा पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणावर परिणाम होत असतो. असा एक समज आहे की पाण्याने प्रेरित होणारे बदल हिमनद्या आणि बर्फ वितळल्यामुळे होतात, पण केवळ यामुळे अक्ष एवढा कसा झुकू शकतो? याचा शोध घेता लक्षात आले की यासाठी भूगर्भातील पाण्याचा र्हासदेखील एक कारण आहे. भूजलाचा बराचसा उपसा सिंचनामुळे होतो.

अक्षातील सर्वात मोठा बदल हा हंगामी असतो आणि हवामान आणि ऋतू बदलत असताना वातावरणीय वस्तुमानाच्या हालचालींमुळे हा बदल होण्यास सुरुवात होते. या परिणामामुळे पृथ्वीचे भौगोलिक ध्रुव दरवर्षी अनेक मीटर्सने सरकतात. पाण्याच्या वस्तुमानातील बदलांमुळे पृथ्वीच्या अक्षाच्या झुकावामध्ये लहान परंतु तरीही मोजता येण्याजोगे बदल होऊ शकतात. पृथ्वीच्या बाबतीत चंद्र व इतर ग्रह जसे मंगळ आणि पृथ्वीचे गुरुत्वाकर्षण बल यामुळे होणार्या प्रभावांमुळेदेखील अक्ष झुकत असतो. तो सामान्यतः २२ ते २५ अंशाच्या मध्ये असतो, परंतु हे बदल जाणवतही नाहीत.

पृथ्वीचे जलचक्र हे पृथ्वीच्या परिभ्रमण अक्षाच्या स्थलांतराचे सर्वात सामान्य कारण आहे. कारण आपण पृथ्वीवर पाण्याच्या रूपात जे वस्तुमान आहे ते खरोखर प्रचंड प्रमाण आहे आणि यात बदल झाला की याचा प्रभाव अक्षावर होतो. जलचक्रातील घटनांमधील मानवी हस्तक्षेप खूप वाढला आहे. हवामान बदलाचा सर्वात मोठा प्रभाव जलचक्रावर होताना दिसतो. पृथ्वीचे पाणी कसे फिरते याचा मागोवा घेणे आणि कालांतराने स्थानिक, प्रादेशिक आणि जागतिक स्तरावर कमी झालेले जलाशय किती समृद्ध आहेत हे समजून घेणे हा आपल्या पृथ्वीवरील महत्त्वाच्या परंतु मर्यादित नैसर्गिक संसाधनाचे व्यवस्थापन करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण प्रयत्न आहे.




पूर्वीच्या अभ्यासातून हे समजले आहे की दक्षिण कॅलिफोर्नियाच्या बर्याच भागांसह जगातील बर्याच दुष्काळी-संवेदनशील प्रदेशांमध्ये पाण्याची पातळी प्रतिवर्षी काही सेंटीमीटरने झपाट्याने कमी होत होती. जागतिक स्तरावर भूजलाचा र्हास कसा होत आहे आणि परिणामी पृथ्वीच्या वस्तुमान वितरणाची पुनर्रचना कशी होत आहे हे समजण्यासाठी अवकाशातून पृथ्वीचे अचूक निरीक्षण करणे आवश्यक आहे. पृथ्वीवर भूजलाचे साठे, पृथ्वीच्या परिभ्रमण अक्षाची गती आणि/किंवा स्थलांतर आणि पृथ्वीच्या महासागरांमध्ये खंडांच्या खाली पूर्वी साठवलेल्या पाण्यामुळे समुद्राच्या पातळीत वाढ होणे यांसारख्या काही जटिल प्रक्रिया आहेत, ज्यामध्ये दरवर्षी फरक पडून सतत बदल होत असतात.

जर आपण भूजल कमी होण्याच्या परिणामांना मोजले नाही तर पृथ्वीचा अक्षीय झुकाव १९९३ ते २०१० कालावधीत इतका कसा झुकला याचे स्पष्टीकरण दिले जाऊ शकत नाही. त्याला केवळ हिमनदी किंवा हिमनदी वितळणे कारणीभूत असू शकत नाही. भूगर्भातील पाणी कमी होण्याचे प्रमाण धक्कादायक आहे. जवळपास २.१५ ट्रिलियन टन पाण्याच्या समान.

एकेकाळी भूजलाच्या रूपात असणार्या सिंचनामुळे कमी झालेले पाणी जाते तरी कोठे? अपेक्षेप्रमाणे हे पाणी पृथ्वीच्या सामान्य जलचक्रात जाते, पण किती? तर केवळ ५० टक्के. प्रश्न असा आहे की भूजलाचे हे प्रमाण महासागरात मिसळल्याने समुद्राची पातळी किती वाढेल? ही महत्त्वपूर्ण संख्या आहे. मोजलेल्या १७ वर्षांच्या कालावधीत ६.२४ मिलीमीटर किंवा दरवर्षी ०.३७ मिलीमीटर. हे एकूण वर्तमान वार्षिक समुद्र पातळीच्या वाढीच्या सुमारे १० टक्के आहे. उर्वरित वाढ बर्फाच्या ध्रुवीय टोप्या आणि हिमनद्या वितळण्यामुळे आणि पृथ्वीच्या उर्वरित भागाबरोबरच ते गरम होत असताना महासागरांच्या औष्णिक विस्तारामुळे होते.

तुलनेने कमी कालावधीत आपण पृथ्वीवर जे भौतिक बदल करीत आहोत ते इतके मोठे आहेत की त्यांचे निरीक्षण करता येण्याजोगे दीर्घकालीन परिणाम होत आहेत. सिंचनासारखी साधी आणि व्यापक प्रथा संपूर्ण पृथ्वीवर असमानपणे भूजल कमी करते. यामुळे पृथ्वीच्या अक्षीय झुकाव आणि आपल्या समुद्राची पातळीवाढीच्या गतीवर परिणाम होत आहे. गेल्या काही दशकांमध्ये आपण ज्या पद्धती सिंचनासाठी वापरत आलो आहोत त्याच जरी आपण चालू ठेवल्या तर हे परिणाम चालूच राहतील, ते अधिक वाईट होतील आणि कालांतराने एकत्रीतपणे वाढतील.

या बदलांचे निरीक्षण सुरू ठेवणे किती महत्त्वाचे आहे हे या नवीन अभ्यासाने समोर आणले आहे. पृथ्वी कशी बदलत आहे आणि मानवी हस्तक्षेप या बदलाला कसे चालना देत आहेत हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे आणि नवीन जलसुरक्षेचे प्रश्र्न उदयास येत असताना ते अधिक महत्त्वाचे होतील. पृथ्वीचा अक्ष ज्या वेगाने झुकत चालला आहे त्या वेगाने समुद्र पातळी वाढण्याचा दर बदलू शकतो. पृथ्वीवर एकाच ठिकाणी केलेले स्थानिक बदल खरोखरच संपूर्ण जगावर परिणाम करतात हे लक्षात घेण्यात शहाणपणा आहे.

**-सुजाता बाबर**

हे पत्र, मुद्रक निखील जयप्रकाश माने यांनी मालक, प्रकाशक, संपादक अशोक व्यंकटराव चिंचोले यांचे करिता चेतन ऑफसेट प्रिंटर्स, १७ शिवाजी हौसिंग सोसायटी, पद्मानगर बार्शी रोड, लातूर येथे मुद्रित केले. हे पत्रक प्रकाशक अशोक व्यंकटराव चिंचोले यांनी दै. भूकंप कार्यालय, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स गांधी चौक, लातूर, ता.जि. लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशीत केले. संपादक- अशोक व्यंकटराव चिंचोले ((:-२५१८२२) RNI NO. MAHMAR/2012/42770

# आरोग्य

## लिंबाचा रस थेट त्वचेवर लावणे योग्य आहे का?



कपडे आणि पादत्राणे यांच्या व्यतिरिक्त चेहरा आपले सौंदर्य आणि व्यक्तिमत्व प्रतिबिंबित करतो. जेव्हा त्वचा निस्तेज आणि गडद दिसते, तेव्हा संपूर्ण देखावा उद्ध्वस्त झालेला दिसतो. त्वचेच्या अनेक समस्यांवर मात करण्यासाठी लोक बाजारात उपलब्ध उत्पादने वापरतात. परंतु यातील रसायनांमुळे लोक नैसर्गिक उत्पादने किंवा घरगुती उपचारांचा अधिक वापर करत आहेत. घरगुती उपचार किंवा नैसर्गिक उत्पादनांचे तोटे खूप कमी आहेत, परंतु ते लावताना झालेली चूक चेहऱ्यावर किंवा त्वचेसाठी जड होऊ शकते.

त्वचा चमकदार होण्यासाठी लोक लिंबाचा रस त्वचेवर लावतात. हा एक असा घटक आहे ज्यामध्ये त्वचेसाठी अत्यंत महत्वाचे असलेले व्हिटॅमिन सी मोठ्या प्रमाणात आढळते. पण तुम्हाला माहित आहे का की ते थेट त्वचेवर लावल्याने अनेक नुकसान होऊ शकतात. ते थेट चेहऱ्यावर लावावे की नाही याबाबत लोकांमध्ये संभ्रम आहे. या लेखात आम्ही तुम्हाला लिंबू चेहऱ्यावर लावणे कितपत योग्य आहे आणि त्याचे तोटे काय आहेत, हे सांगणार आहोत.

हेल्थलाइनमध्ये प्रसिद्ध झालेल्या रिपोर्टनुसार, लिंबाचा रस थेट चेहऱ्यावर लावल्यास त्वचेशी संबंधित अनेक समस्या उद्भवू शकतात. जरी त्यात ब्लीचिंग इफेक्ट्स आणि व्हिटॅमिन सी आहे, परंतु थेट त्वचेवर लागू करणे भारी पडू शकते. लिंबू थेट त्वचेवर लावल्याने लालसरपणा, पुरळ किंवा ऍलर्जी होऊ शकते. तुम्हाला माहिती आहे का की लिंबू सेवनाने सनबर्नची समस्या आणखी वाढू शकते. कारण त्याचे ब्लीचिंग इफेक्ट त्वचा जाळण्याचे काम करू शकतात.

**अशा प्रकारे त्वचेवर लावा लिंबाचा रस**

लिंबाचा रस चेहऱ्यावर लावायचा असेल, तर या वस्तूंमध्ये मिसळून लावा. जाणून घ्या कोणत्या गोष्टींमध्ये लिंबू मिक्स करून लावू शकता.

लिंबू आणि मध मिसळा आणि त्वचेवर लावा. लिंबू त्वचा स्वच्छ करेल, तर मध ते मऊ करण्याचे काम करेल.

चेहऱ्याच्या खोल स्वच्छतेसाठी तुम्ही लिंबाचा रस मध दह्यात मिसळून त्वचेवर लावू शकता. तसे, दही आणि लिंबाच्या रेसिपीमुळे केसांमधील कोंडा दूर होतो.

खोबरेल तेल आणि लिंबाच्या रसापासून नैसर्गिक क्रीम बनवता येते. याने चेहऱ्याला मसाज केल्याने उन्हाळ्यात त्वचा चमकदार बनवता येते.

## जीवघेणा ठरू शकतो डेंग्यूचा ताप, ही लक्षणे दिसताच पोहोचा रुग्णालयात




येत्या काही दिवसांत डेंग्यूचे रुग्ण वाढण्याची शक्यता आहे. हा ऋतू या आजारासाठी अनुकूल असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. पावसामुळे अनेक ठिकाणी पाणी तुंबते. यामध्ये डासांची उत्पत्ती सुरू होते. अशा स्थितीत आगामी काळात डेंग्यूचा संसर्ग वाढणार आहे. कमकुवत प्रतिकारशक्ती असलेल्या लोकांना जास्त धोका असू शकतो. डेंग्यूचा सामना करण्यासाठी आतापासूनच बचाव करणे आवश्यक आहे. निष्काळजीपणा केल्यास डेंग्यूही जीवघेणा ठरू शकतो.

आरोग्य धोरण तज्ज्ञांनी सांगितले की, सुरुवातीला डेंग्यूची लक्षणे सौम्य असतात. यामध्ये ताप येतो, पण काही लोकांमध्ये हा आजार जीवघेणे रूप घेऊ शकतो. खूप ताप सुरू होतो आणि तो अनेक दिवस टिकतो. तीव्र डोकेदुखी देखील असू शकते. तापासोबतच शरीरात पुरळ येऊ लागते. या लक्षणांकडे दुर्लक्ष केले जाऊ नये.

डेंग्यूच्या ताणतणावात बदल होत असल्याचे काही स्ट्रेन खूप धोकादायक असतात. एकदा डेंग्यू झालेल्या व्यक्तीला तो पुन्हा होऊ शकतो. दुसऱ्यांदा नवीन स्ट्रेनचा संसर्ग होतो. अशा परिस्थितीत एकदा डेंग्यू झाला की पुन्हा होणार नाही, असा विचार करू नका.

तज्ज्ञ स्पष्ट करतात की डेंग्यूमुळे रुग्णांना शॉक सिंड्रोम होऊ शकतो. यामध्ये रुग्णाला थंडी वाजते. बीपी अचानक वाढू लागतो आणि बेहोशी सुरू होते. अनेक अवयवांमध्ये रक्ताभिसरणही कमी होते. अंगात थरकाप होऊन घाम येणे सुरू होते. अनेक रुग्णांमध्ये हेमॅटोक्रिटची पातळीही वाढू लागते. त्यामुळे शरीरात रक्ताच्या गुठळ्या तयार होऊ लागतात. अशा परिस्थितीत वेळेवर उपचार न मिळाल्यास रुग्णाचा मृत्यू होऊ शकतो. लोकांना सल्ला दिला जातो की जर डेंग्यूचा ताप तीन दिवसांपेक्षा जास्त काळ टिकत असेल तर अशा परिस्थितीत रुग्णालयात जा.

डेंग्यूपासून बचाव कसा करायचा
घराभोवती स्वच्छता ठेवा
कुलर, कुंड्यांमध्ये आणि घराच्या आजूबाजूला पाणी साठवू नका
पूर्ण बाह्यांचे कपडे घाला
रात्री मच्छरदाणी वापरा

## तुम्हालाही रात्री येत नाही का झोप? ही आहेत शरीरातील या ४ जीवनसत्त्वांच्या कमतरतेची लक्षणे




आजकाल लोकांमध्ये झोप न येण्याची समस्या वाढत आहे. त्यामुळे त्यांना अनेक आजारांना सामोरे जावे लागत आहे. अनेकदा असे मानले जाते की झोप न लागणे हे मानसिक समस्या किंवा रात्री उशिरा झोपण्याच्या सवयीमुळे असते, परंतु तुम्हाला माहित आहे का की शरीरात जीवनसत्त्वांच्या कमतरतेमुळे देखील ही समस्या उद्भवू शकते.

चांगल्या झोपेसाठी शरीरात ४ जीवनसत्त्वे पुरेशा प्रमाणात असणे आवश्यक असल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे. त्यांच्या कमतरतेमुळे झोपेशी संबंधित समस्या उद्भवू शकतात. रात्रीच्या चांगल्या झोपेसाठी कोणती पाच जीवनसत्त्वे आवश्यक आहेत हे तज्ज्ञांकडून जाणून घेऊया.

**व्हिटॅमिन बी १२**

ज्येष्ठ चिकित्सक सांगतात की व्हिटॅमिन १२ हे मज्जासंस्था आणि लाल रक्तपेशींसाठी खूप महत्त्वाचे आहे. या जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे झोपेचे विकार होऊ शकतात. व्हिटॅमिन बीच्या कमतरतेमुळे रेस्टलेस लेग सिंड्रोम आणि स्लीप एपनियासारखे आजार होऊ शकतात.

**व्हिटॅमिन ई**

ज्येष्ठ चिकित्सक स्पष्ट करतात की व्हिटॅमिन ई शरीरात एक प्रकारे अँटिऑक्सिडंटसारखे कार्य करते. व्हिटॅमिन ईच्या कमतरतेमुळे झोपेचा त्रास होतो. ही जीवनसत्त्वे शरीरात पुरेशा प्रमाणात असतील तर झोपेचे विकार होण्याची शक्यता कमी असते. अशा परिस्थितीत या जीवनसत्त्वाची कमतरता पूर्ण करणे आवश्यक आहे.

**व्हिटॅमिन डी**

व्हिटॅमिन डी केवळ हाडे किंवा केसांच्या वाढीसाठीच नाही, तर चांगली झोपेसाठी देखील खूप महत्वाचे आहे. काही संशोधनात असे आढळून आले आहे की व्हिटॅमिन डीच्या कमतरतेमुळे स्लिप पॅटर्नवर परिणाम होतो. यामुळे झोप कमी होऊ शकते. आजकाल बहुतेक लोकांना व्हिटॅमिन डीची कमतरता जाणवत असल्याने झोप न येण्याची समस्या देखील यामुळे वाढत आहे.

**व्हिटॅमिन सी**

व्हिटॅमिन सी आपल्या शरीराची प्रतिकारशक्ती चांगली ठेवते. यासोबतच ते शरीरात कोलेजनही बनवते. या व्हिटॅमिनच्या कमतरतेमुळे स्लीप एपनिया होऊ शकतो. चांगल्या झोपेसाठी व्हिटॅमिन सी देखील खूप महत्वाचे आहे.

## गट फीलिंग म्हणजे काय?

तुम्हाला कधी गट फीलिंग येते का? तुम्ही कधी विचार केला आहे की ही भावना का होते? पोटात एक छोटासा मेंदू आहे आणि त्यामुळेच तुम्हाला आतड्यांसंबंधीची अनुभूती येते असे सांगितले तर तुम्हाला कसे वाटेल.

वैज्ञानिक संशोधनानुसार आपल्या पोटात दुसरा मेंदू असतो ज्याला आंतरीक मज्जासंस्था



(एनट्रेरिक नर्वस सिस्टम) म्हणतात. येथूनच इंग्रजीत 'गट फीलिंग' ही म्हण वारंवार वापरली जाते.

जेव्हा काही घडणार असल्यास तेव्हा तुम्हालाही पोटात काहीतरी जाणवतं का ? आपल्या पोटात एक न्यूरॉन प्रणाली आहे ज्यामध्ये न्यूरोट्रांसमीटर असतात जे पचन सुरळीत करण्याव्यतिरिक्त पोटात सामान्यपणे जाणवणाऱ्या हालचालीसाठी देखील जबाबदार असतात. या न्यूरॉन प्रणालीला दुसरा मेंदू देखील म्हणतात.

ओटीपोटात आढळणारा छोटा मेंदू, आपल्या डोक्यातील मेंदूसह, आपल्या मानसिक स्थितीवर प्रभाव पाडतो आणि त्याच वेळी आपल्याला अनेक रोगांपासून वाचवतो. शरीरातील या लहान मेंदूची भावनिक बाबींमध्ये किंवा निर्णय घेण्याच्या परिणामांमध्ये कोणतीही भूमिका नसते.

तरी सामान्य रुपात गट फीलिंग तेव्हा येते जेव्हा आम्हाला त्याबद्दल काही अनुभव असेल किंवा त्याविषयी काही आठवणी जुळलेल्या असतील. आता प्रश्न असा आहे की जेव्हा ही फीलिंग येते तेव्हा यावर निर्णय घ्यावे की नाही?

अनुभव- अनुभावाच्या आधारावर गट फीलिंगवर विश्र्वास करु शकता. एखाद्या प्रकरणात आपली गट फीलिंग योग्य ठरली असेल तर आपण भविष्यात देखील विश्र्वास करु शकता.

मोठे निर्णय घेताना - अनेकदा घर खरेदी करणे, विवाह करणे या सारख्या गोष्टींचा निर्णय घेताना गट फीलिंगवर विश्र्वास करणे अनेकदा योग्य ठरतं. रिसर्चप्रमाणे गट फीलिंगने निर्णय घेणारे अधिक आनंदी राहतात.

## पावसाळ्यात चुकूनही खाऊ नका या भाज्या, आरोग्याला होऊ शकते मोठी हानी



पावसाळ्यात उष्ण आणि थंडीच्या बदलत्या हवामानामुळे रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होते आणि आजारी पडण्याची शक्यता खूप वाढते. मुले असोत की मोठे मुसळधार पावसात, खाण्यापिण्याची विशेष काळजी घेणे खूप गरजेचे असते. पावसाळ्याच्या दिवसात आहाराची योग्य काळजी घेतली नाही आणि संतुलित आहार घेतला नाही, तर तुमच्या आरोग्याला हानी पोहोचू शकते.

पावसाळ्यात जंक फूड आणि मसालेदार तळलेले पदार्थ खाण्यापासून अंतर ठेवावे, यासोबतच काही भाज्या आहेत, ज्या पावसाळ्यात आहारातून वगळल्या जातील. पावसाळ्यात या भाज्या किंवा अन्न खाल्ल्यास आरोग्य बिघडू शकते. चला तर मग जाणून घेऊया कोणत्या आहेत या भाज्या.

दुग्धजन्य पदार्थांपैकी एक, दही हे पोषक तत्वांनी समृद्ध मानले जाते आणि ते आरोग्याच्या दृष्टीने देखील खूप फायदेशीर असल्याचे म्हटले जाते. मात्र, पावसाळ्यात दही खाणे टाळावे. त्यामागचे कारण दह्याचा कूलिंग इफेक्ट असल्याचे सांगितले जाते. पावसाच्या बदलत्या ऋतूमध्ये दही सेवन केल्यास सर्दी, पडसे यासारख्या समस्या उद्भवू शकतात.

बहुतेक लोक जेवणासोबत सॅलड खातात. अशा अनेक भाज्यांचा समावेश सॅलडमध्ये केला जातो ज्यामध्ये भरपूर पोषक असतात. पण पावसाळ्याच्या दिवसात रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होत असते. अशा परिस्थितीत कच्च्या भाज्यांचे सेवन टाळावे.

पावसाळ्यात मशरूम खाण्यास मनाई आहे. वास्तविक मशरूम ही एक प्रकारची बुरशी आहे, जी मातीच्या अगदी जवळ वाढते. अशा परिस्थितीत पावसाळ्याच्या दिवसात मशरूममध्ये बॅक्टेरिया असण्याची शक्यता असते, जे तुमच्या आरोग्याला हानी पोहोचवू शकतात.

निरोगी आणि जोमदार राहण्यासाठी नेहमी हिरव्या भाज्यांचा आहारात समावेश करण्याचा सल्ला दिला जातो, परंतु पावसाळ्यात हिरव्या भाज्या कमी घ्याव्यात. वास्तविक, यामागचे कारण म्हणजे या दिवसात हिरव्या भाज्यांमध्ये किडे इ.ची शक्यता वाढते.

## फळं की फळांचा ज्यूस? आरोग्यासाठी फायदेशीर काय? जाणून घ्या



अनेकदा डॉक्टर आपल्याला निरोगी राहण्याकरता रोज किमान एखादे फळ किंवा फळाचा ज्यूस पिण्याचा सल्ला देतात. बरेच लोक दिवसाची सुरुवात फळे खाऊन किंवा फळाचा ज्यूस पिऊन करतात. फळे आपल्या शरीरासाठी अतिशय पौष्टिक आणि आरोग्यदायी असतात असे म्हटले जाते. फळांपासून आपल्याला भरपूर खनिजे आणि जीवनसत्त्वे तसेच कॅलरीज मिळतात. फळे शरीरासाठी देखील आवश्यक असतात त्यातील नैसर्गिक गोडवा आणि साखर शरीरासाठी फायदेशीर असते. मात्र सकाळी रिकाम्या पोटी फळ किंवा रस पिणे योग्य आहे का जाणून घेऊयात.

**वजन कमी करण्याकरता फळ खाणे आहे लाभदायक**

फळे खाल्ल्याने शरीराला अनेक फायदे होतात. फळामध्ये भरपूर फायबर असते जे पचनसंस्थेसाठी खूप चांगले असते. तसेच वजन कमी करण्यात आणि रक्तातील साखर नियंत्रित करण्यात फळाची भूमिका महत्त्वाची असते. फळांमध्ये असलेले जीवनसत्त्वे, खनिजे, अँटिऑक्सिडंट्स आणि फायटोकेमिकल्स शरीरातील जुनाट आजार दूर करण्यासाठी खूप फायदेशीर ठरतात . यामध्ये तुम्ही बेरी, सफरचंद, पीच, संत्री , मोसंबी आणि द्राक्षे खाऊ शकता. तुम्हाला संतुलित आहार घेणे आवश्यक आहे, ज्यामध्ये कडधान्य, भरपूर पालेभाज्या, प्रथिने यांचा समावेश असणे शरीराच्या दृष्टीने गरजेचे आहे. फळे खाल्ल्याने लठ्ठपणा आणि आजारांचा धोकाही कमी होतो. फळे आणि भाज्या खाल्ल्याने शरीराला भरपूर आहार मिळतो. यासोबतच फळे खाल्ल्याने वजन कमी होण्यास मदत होते. फळांमध्ये कॅलरीज कमी असतात आणि फायबरचे प्रमाण जास्त प्रमाणात न घेता तुम्हाला लवकर ताजेतवाने वाटते.

**फळांचा ज्यूस प्यावा कि नाही**

फळांचा ज्यूस पिताना काही गोष्टींची विशेष काळजी घ्या की, ज्यूस फक्त एका फळापासून बनत नाही, त्यात अनेक फळे मिसळलेली असतात. जर तुम्हाला अनेक फळांची चव चाखायची असेल तर तुम्ही ज्यूस पिऊ शकता. पण फळांचा ज्यूस बनवल्यानंतर त्यातील फायबरचे प्रमाण कमी होते. फळांचा ज्यूस बनवताना त्यातील पोषक घटक देखील कमी होतात. त्यात असलेली साखर आणि कॅलरीजही वाढतात. बाजारात उपलब्ध असणारे पॅकेटमधील ज्यूस आरोग्यासाठी अत्यंत हानिकारक असू शकतात. तुम्ही फळांचा ज्यूस ज्या वेळी पिता त्यावेळी त्यात असणारे सर्व फायबर नष्ट होतात. परिणामी शरीरातील साखरेचे प्रमाण वेगाने वाढते किंवा अचानकच खूप कमी होते. सतत फळाचा ज्यूस पिल्याने तुमचे वजन वाढण्याचा धोकाही मोठ्या प्रमाणात असतो. तुम्हाला फळे चावून खाणे आवडत नसल्यास तुम्ही फळांची स्मूदी देखील पिऊ शकता.

## श्रावणात उपवास करणे आरोग्याच्या दृष्टीने आहे लाभदायक

हिंदू धर्मात श्रावणाला फार महत्व आहे. या महिन्यात शंकराची पूजा केली जाते. येत्या १८ जुलैपासून श्रावणाला सुरुवात होत आहे. श्रावण महिना देशभरातील लोकांकडून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या संपूर्ण महिन्यात येणार्या सर्व सोमवारी बहुतेक महिला आणि पुरुष उपवास ठेवतात. अनेक स्त्रिया संपूर्ण श्रावणाच्या प्रत्येक दिवशी भगवान शंकराची पूजा करतात आणि पाणी, दूध आणि बेलची पाने अर्पण करतात. यंदा अधिकमास येत असल्याने हिंदू पंचांगानुसार श्रावण महिना दोन महिन्यांचा असणार आहे. एवढेच नाही तर या संपूर्ण महिन्यात लोक सात्विक भोजन करतात. याचे शरीराला अनेक फायदे होतात.

श्रावण महिन्यात पाऊस मोठ्या प्रमाणात होतो. पावसाळ्यात सगळीकडे हिरवळ असते. या ऋतूत वातावरणातील आर्द्रताही वाढते. या आर्द्रतेमुळे पचनसंस्था कमकुवत होते. त्यामुळे पोटाशी संबंधित समस्या उद्भवू लागतात. यामुळेच या ऋतूमध्ये पोट खराब होणे, अपचन, ऍसिडिटी, अन्नातून विषबाधा (Food Poisoning) अशा समस्यांना तोंड द्यावे लागते.

**श्रावणात उपवास करणे का गरजेचे आहे?**

श्रावणात मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो. पावसाळ्यात दूषित पाण्यामुळे अनेक आजार बळावतात. पोटांच्या बऱ्याच समस्या देखील पावसाळ्याच्या ऋतूतच होतात. श्रावणात उपवास केल्याने रोजच्या खाण्यात पालेभाज्यांचा समावेश केला जात नाही. यामुळे तुम्ही संसर्गजन्य आजारांपासून दूर राहू शकता.



**श्रावणात उपवास करण्याचे काय फायदे आहेत**

आयुर्वेदानुसार जर तुम्ही श्रावण महिन्यात एक दिवसही उपवास ठेवलात तर तुम्हाला आरोग्याशी संबंधित समस्या येत नाहीत. असे केल्याने पोटाशी संबंधित अनेक समस्या टाळता येतात. पोटदुखी, गॅस, ॲसिडिटीच्या समस्येपासूनही आराम मिळतो.तसेच उपवास केल्याने भूक चांगली लागते तर वजन कमी होण्यास देखील मदत होते. उपवासाच्या वेळी द्रव पदार्थ जास्त खाल्ले जातात यामुळे शरीर हायड्रेटेड राहते. तुमच्या रोजच्या आहाराचा थेट परिणाम हा त्वचेवर होतो. उपवासात बाहेरचे जंक फूड खाल्ले जात नाही. सोबतच मसालेदार पदार्थ देखील खाल्ले जात नाही. यामुळे त्वचा चांगली राहते. उपवास केल्याने कोलेस्टेरॉलचा धोकाही कमी होतो. रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी उपवास अत्यंत फायदेशीर मानला जातो. तसेच उपवासामुळे शरीरातील साखरेची पातळी नियंत्रणीत राहण्यास मदत होते.

## मधुमेहाचं नवं धोकादायक लक्षण, जाणवल्यास लगेचच करा तपासणी

अलिकडच्या काळात मधुमेहाचा धोका वाढताना दिसत आहे. भारतातही मधुमेहाच्या रुग्णांमध्ये वाढ होत आहे. मधुमेहाचं लक्षणं ओळखणं फार कठीण होऊ शकतं. आता मधुमेहाचं आणखी एक धोकादायक लक्षण समोर आलं आहे. याकडे सहजा आपण दुर्लक्ष करतो एका संशोधनात दावा करण्यात आला आहे की, तुमच्या तोंडांतून दुर्गंधी येत असल्यास हे मधुमेहाचं लक्षण असून शकतं. त्यामुळे याकडे दुर्लक्ष करु नका आणि लक्षण दिसल्यास लगेचच तपासणी करुन घ्या.

**मधुमेहाचं नवं धोकादायक लक्षण**

मधुमेहाचं या लक्षणाचा संशोधक आणि डॉक्टरांनी आधीच शोध लागला होता. पण बहुतेक जणांना याबाबत माहिती नव्हती. सध्या हे लक्षण चर्चेत आल्यामुळे हे नवं मधुमेहाचं नवीन लक्षण असल्याचं म्हटलं जात आहे. या मधुमेहाच्या या लक्षणाला कीटोॲसिडोसिस असं म्हटलं जातं.

**डायबेटिक कीटोॲसिडोसिस म्हणजे काय?**

डायबेटिक कीटोॲसिडोसिस ही शरीरातील एक प्रक्रिया आहे. यामध्ये इंसुलिनच्या कमतरतेमुळे रक्तामध्ये हानिकारक केटोन्स तयार होतात. हे मधुमेहाचं असामान्य लक्षण आहे. हे मधुमेहाचं सुरुवातीचं लक्षण असल्याचा दावा केला जात आहे. या दाव्यानुसार, मधुमेहामुळे श्र्वासाला दुर्गंधी देखील येऊ शकते कारण, या स्थितीमुळे तोंडातील ग्लुकोजचं प्रमाण वाढू शकतं. जीवाणू या साखरेचा अन्न म्हणून वापर करतात ज्यामुळे नंतर संसर्ग आणि हिरड्यांचे आजार होतात. हिरड्यांचा आजार हे हॅलिटोसिसचे सर्वात सामान्य कारणांपैकी एक आहे ज्यामध्ये हॅलिटोसिस होतो.

**अत्यंत धोकादायक स्थिती**

इन्सुलिन हार्मोन शरीरातील रक्तातील साखर नियंत्रित करते. अमेरिकेच्या रोग नियंत्रण आणि प्रतिबंध केंद्राच्या (उऊउ) माहितीनुसार, डायबेटिक केटोआसिडोसिस ही एक धोकादायक स्थिती आहे, ही जीवघेणी ठरू शकते. यामध्ये इन्सुलिन खूप कमी होते आणि शरीरात केटोन्स तयार होऊ लागतात. हे केटोन्स शरीरासाठी विषारी असतात. डायबेटिक केटोआसिडोसिसची हे मधुमेहाच्या माहित नसलेल्या लक्षणांपैकी एक आहे. यामुळे केटोन्सची पातळी खूप वाढते आणि श्र्वासाला दुर्गंधी येऊ लागते.

**ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्या**

CDC नुसार, तुम्ही स्वतः केटोन्सची पातळी तपासू शकता. यासाठी तुम्हाला केटोन टेस्ट किट आणावे लागेल. या किटच्या साहाय्याने तुम्ही लघवीद्वारे केटोन्सची पातळी तपासू शकतात. तुमच्या रक्तात केटोन्स जास्त असल्यास आणि श्र्वासात दुर्गंधी येत असल्यास दुर्लक्ष करु नका, ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्या.

**वाचकांना विनंती**

सांज दै. भूकंपच्या अंकात विविध विषयावर लेख असतात. या लेखातील मत, दावे याविषयी संपादक सहमत असतात असे नव्हे, दैनिकात प्रसिद्ध होणारे अग्रलेख संपादकाचे मत असते, याची जबाबदारी संपादकाची आहे. याची वाचकांनी नोंद घ्यावी.

– व्यवस्थापक, सांज दै. भूकंप, लातूर

## कानात येऊन सांगितलं असतं तरी अध्यक्ष केल असतं

मुंबई : मला कानात येऊन सांगितलं असतं तरी अध्यक्ष केलं असतं, असा टोला जयंत पाटील यांनी अजित पवार यांना लगावला. शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावली होती. या बैठकीत जयंत पाटील यांनी अजित पवार यांच्यावर निशाणा साधला. जयंत पाटील म्हणाले, शरद पवार यांनी मला सांगितलं होतं की जयंत आता अध्यक्ष बदलावा लागेल. मी तत्काळ होकार दिला होता. आजच्या बैठकीत अध्यक्ष ठरला असता. मी माझ्या मुलाला सांगून ठेवलं होतं की तिकिट काढून ठेवं, फिरायला जाऊ. मी प्रदेशाध्यक्ष नात्याने सर्व ठिकाणी फिरलो. जेथे राष्ट्रवादीचा आमदार नाही तेथेही उमेदवार उभा करण्याचा आग्रह कार्यकर्त्यांना केला. संपूर्ण ताकद लावली. पाच वर्षे होऊन गेली. त्यामुळे मी अध्यक्षपद सोडायला तयार होतो. एकदा कानात येऊन सांगितलं असतं तर लगेच त्यांना अध्यक्ष केलं असतं. आता जे झालं आहे त्याची सल मनात आहे. त्यामुळे मुळाकडे परत जाण्याची मानसिकता ठेवायला हवी.


लातूर

# भूकंप

http://epaper.dainikbhukamp.com

LATUR BHUKAMP

गुरूवार ६ जुलै २०२३




## अजित पवार राष्ट्रवादीचे अध्यक्ष; चिन्ह आणि पक्षावर दावा, निवडणूक आयोगाकडे याचिका

नवी दिल्लीः अजित पवार हेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष आहेत, असा दावा करणारी याचिका निवडणूक आयोगाकडे दाखल झाली आहे. ४० आमदारांच्या सहीची ही याचिका निवडणूक आयोगाकडे सादर झाली आहे. त्यामुळे अजित पवार हेच राष्ट्रवादीचे प्रमुख असून त्यांच्याकडे पक्षाचे चिन्ह आहे, असे ही याचिका सांगते. तर जयंत पाटील यांनीही एक याचिका दाखल केली आहे. आमचे म्हणणे ऐकून घेतल्या शिवाय कोणताही निर्णय आयोगाने देऊ नये, अशी विनंती याचिकेद्वारे करण्यात आली आहे. त्यामुळे शिवसेनेप्रमाणे आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातही चिन्ह आणि पक्षावरुन कायदेशीर लढाई सुरु झाली आहे.

# आ. कराड यांच्या हस्ते नरवटवाडी येथील १८ जणांना जनवरांचे गोठे मंजुरी आदेश वाटप

लातूर : भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते रेणापूर तालुक्यातील मौजे नरवटवाडी येथील आठरा शेतकऱ्यांना जनवरांचे गोठे मंजूरी आदेश पत्राचे वाटप बुधवारी लातूर येथील संवाद कार्यालयात छोटेखानी कार्यक्रमात करण्यात आले. यावेळी नरवटवाडी येथील ग्रामस्थांच्या वतीने यथोचित सत्कार करून आ. कराड यांचे आभार व्यक्त केले.

भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. रमेशअप्पा कराड यांच्या मार्गदर्शनाखाली आणि भाजपाचे प्रदेश सदस्य सतिश अंबेकर यांच्या प्रयत्नातून महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना अंतर्गत रेणापूर तालुक्यातील मौजे नरवटवाडी येथील आठरा शेतकऱ्यांना जनावरांचे गोठे वैयक्तीकरित्या मंजूर झाले आहेत. शेतकऱ्यांकडे दिवसेंदिवस जनावरांची संख्या कमी होत असून नव्या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेतीची कामे करण्यावर भर दिला जात आहे.

मात्र जनावरे हीच शेतकऱ्यांची खरी संपत्ती असून या संपत्तीचे जतन व्हावे, शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी शासनाच्या वतीने जनावरांचे गोठे दिले जात असून या योजनेनुसार प्रत्येक शेतकऱ्यांना ७७ हजार रूपयाचे शेड उभारणीसाठी अनुदान मिळते. सदरील मंजूरी पत्राचे वाटप बुधवारी दुपारी भाजपाच्या संवाद कार्यालयात आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भाजपाचे तालुकाध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे, भाजपाचे प्रदेश कार्यकारीणी सदस्य सतीश अंबेकर, भागवत सोट, माजी तालुकाध्यक्ष श्रीकृष्ण जाधव, महिला आघाडीच्या तालुकाध्यक्षा अनुसया फड, नरवरटवाडीचे सरपंच सुकेश शिंदे, उपसरपंच प्रल्हाद आघाव, दत्ता अंबेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

नरवटवाडी येथील केशव आघाव, भाऊसाहेब अंबेकर, ज्ञानोबा अंबेकर, गंपू अंबेकर, विद्यासागर आघाव, अंकूश आघाव, सुग्रीव अंबेकर, मंचक अंबेकर, महादेव आघाव, गणेश आघाव, देवराव अंबेकर, सुमन घोडके, व्यंकटी आघाव, यशवंत दहिफळे, जगन्नाथ अंबेकर, दत्तू चिताडे, श्रीहरी अंबेकर, दत्तात्रय अंबेकर या आठरा शेतकऱ्यांना आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते जनावरांचे गोठे मंजूरी आदेशाचे पत्र वाटप करण्यात आले. यावेळी ग्रामस्थांच्या वतीने यथोचित सत्कार करून आ. कराड यांचे आभार व्यक्त केले.



# राष्ट्रीय सांख्यिकी दिना निमित्त सहायक संशोधन अधिकारी एस.पी.बोदडे यांचा मुंबई येथे गौरव

लातूर : अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील अधिकारी, कर्मचारी यांनी सांख्यिकीय क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल संपुर्ण महाराष्ट्रातून २५० नामनिर्देशने प्राप्त झाली होती. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई विजय आहेर यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या समितीने प्राप्त झालेल्या नामनिर्देशनातुन लातूर येथील जिल्हा सांख्यिकी कार्यालयातील सहायक संशोधन अधिकारी संतोष पांडुरंगराव बोदड यांची पुरस्कारासाठी निवड करुन ग्रामविकास विभागाचेप्रधान सचिव एकनाथ डवले यांचे हस्ते सन्मानपत्र देवुन त्यांचा गौरव करण्यांत आला.

महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अधिनस्त असलेल्या अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई यांच्यामार्फत दवर्षीप्रमाणे यावर्षी दिनांक २९ जून, २०२३ हा दिवस गृह विभागाचे अपर मुख्य सचिव श्रीमती सुजाता सौनिक यांच्या अध्यक्षतेखाली यशवंतराव चव्हाण सेंटर, जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई येथे राष्ट्रीय सांख्यिकी दिन म्हणून साजरा करण्यांत आला. राष्ट्रीय सांख्यिकी दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्रातील सांख्यिकी क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या तसेच कार्यालयीन सांख्यिकीय क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांचा गुणगौरव सोहळा मुंबई येथे संपन्न झाला. या कार्यक्रमास नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, अपिल व सुरक्षा विभागाचे प्रधान सचिव दिनेश वाघमारे, उच्च व तंत्रशिक्षणचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव श्रीमती राधिका रस्तोगी, अन्न व नागरी पुरवठा विभागाचे सचिव विजय वाघमारे आणि पुणे हरीभाई व्ही.देसाई महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र गुरव यांची विशेष अतिथी म्हणून उपस्थिती होती. मुंबई अर्थ व सांख्यिकी संचालनालयाचे संचालक विजय आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सांख्यिकी दिन उत्साहात पार पडला.

# रिझर्व्ह बँक, जिल्हा अग्रणी बँक व जिल्हा प्रशासनाच्या समन्वयाने विद्यार्थ्यांसाठी वित्तीय साक्षरता परीक्षा

लातूर : भारतीय रिझर्व्ह बँक, जिल्हा अग्रणी बँक लातूर आणि जिल्हा प्रशासन यांच्या समन्वयाने विद्यार्थ्यांसाठी सोमवार, दि. ३ जुलै २०२३ रोजी वित्तीय साक्षरता परीक्षा जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृह येथे घेण्यात आली.

आर्थिक समावेशनाचे उद्दिष्टे पुढे नेण्यासाठी रिझर्व बँक ऑफ इंडियाने जिल्ह्यातील दहा तालुक्यांमधील आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी जिल्हास्तरीय परीक्षा सोमवार , दि. ३ जुलै, २०२३ रोजी आयोजित केली होती. या वित्तीय साक्षरता परीक्षेत जिल्ह्यातील दहा शाळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या परीक्षेत जिल्हा परिषद प्रशाला किनगावच्या विद्यार्थिनी कु. अपेक्षा बालाजी कांबळे व कु. अदिती अंबादास कांबळे यांनी प्रथम पारितोषिक पटकावित राज्यस्तरीय फेरीसाठी त्यांची निवड झाली आहे. तसेच जिल्हा परिषद प्रशाला हडोळतीचे विद्यार्थी कु. ऋतुजा महादेव हडोळतीकर व ओंकार लिंगुअप्पा मिरजगावे यांनी द्वितीय पारितोषिक पटकावले. शिवाय जिल्हा परिषद प्रशाला तांदूळजाचे विद्यार्थी कु. आकांक्षा नरसिंग गणगे व लक्ष्मण महादेव मुगळे यांनी तृतीय पारितोषिक पटकावले.

या विद्यार्थ्यांना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी रिझर्व्ह बँक चे सहायक महाव्यवस्थापक सुभान बाशा, नाबार्डचे सहायक महाव्यवस्थापक प्रमोद पाटील, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक प्रमोद शिंदे आणि विविध शाळांचे शिक्षक उपस्थित होते.

# औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील प्रवेश प्रक्रिया सुरू

## विद्यार्थ्यांनी ११ जुलैपर्यंत ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावेत

लातूर : औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील प्रवेश प्रक्रिया दि. १२ जून, २०२३ पासून सुरू करण्यात आलेली असून दहावी उत्तीर्ण अथवा अनुत्तीर्ण इच्छूक विद्यार्थ्यांनी admission. cdvet. gov.in संकेतस्थळावर जाऊन दि. ११ जुलै, २०२३ पर्यंत ऑनलाईन पद्धतीने प्रवेश अर्ज सादर करावेत, असे आवाहन लातूर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य यांनी केले आहे.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रवेश घेण्यासाठी तयार करण्यात आलेल्या प्रमाणित कार्यपध्दतीची माहिती पुस्तिका ऑनलाइन स्वरूपात वरील संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. अर्ज नोंदवून झाल्यावर उमेदवारांनी नजीकच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये जाऊन आपला अर्ज निश्चित करावा व त्यानंतर विकल्प सादर करावेत. प्रवेश प्रक्रियेच्या विविध टप्यांबाबत औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये समुपदेशन करण्यात येत आहे. यामध्ये उमेदवारांना विविध व्यवसाय अभ्यासक्रमांची माहिती देण्यात येते.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये राज्यभरात एकूण ८५ व्यवसाय उपलब्ध असून १५लाख ४ हजार ९३२ एवढ्या जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. येणाऱ्या कालावधीत औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये जादा मागणीचे तसेच आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित ६५२ नवीन अभ्यासाच्या तुकड्या सुरू करण्यात प्रस्तावित आहे. तसेच जागतिक बँकेच्या सहकार्याने औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे आधुनिकीकरण करण्यात येत आहे. तसेच आयटीआय प्रवेशित उमेदवारांना प्रतिमाह देण्यात येणाऱ्या विद्यावेतनात वाढ करण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे. विविध प्रवर्गाच्या उमेदवारासाठी प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्वी योजनाही लागू करण्यात आलेली आहे. दहावी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना आयटीआय अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर नियमानुसार दहावी उत्तीर्ण समकक्षता प्रदान करण्यात येते. तर दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना आयटीआय अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर नियमानुसार बारावी उत्तीर्ण समकक्षता प्रदान करण्यात येते. दहावी उत्तीर्ण अथवा अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात येते की आयटीआयतून व्यावसायिक शिक्षण पूर्ण करून त्वरित रोजगार, स्वयंरोजगार अथवा उच्च शिक्षणाच्या संधी प्राप्त होण्यासाठी आयटीआय मध्ये प्रवेश घ्यावे.

# एक रुपयात पिक विमा भरण्यास सुरुवात

## अंतिम मुदतीची वाट न पाहता शेतकऱ्यांनी वेळेत पिक विम्यात सहभाग नोंदवावा-जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांचे आवाहन

लातूर : खरीप हंगामातील पिकासाठी प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत एक रुपयात विमा प्रस्ताव सादर करण्याची ३१ जूलै, २०२३ ही अंतिम मुदत आहे. यावर्षी पिक विमा हा फक्त १ रुपयात काढून मिळणार असून भरपूर शेतकरी विमा भरतील व यामुळे शेवटच्या टप्यात तांत्रीक अडचणी निर्माण होतात म्हणून शेतकऱ्यांनी लवकरात लवकर वेळेत विमा भरून सहभाग नोंदवावा असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्रीमती रक्षा शिंदे लातूर यांनी केले आहे.

कर्जदार शेतक-यांनी विमा संरक्षित क्षेत्रामध्ये पिक बदलाबाबत सुचना देण्याचा अंतिम दिनांक विमा नोंदणीच्या अंतिम दिनांकापुर्वी २ कार्यालयीन दिवस अगोदर असेल. तरी शेवटच्या टप्यात गर्दी व घाई न करता वेळेत आपल्या अधिसूचित पिकाचे विमा संरक्षणासाठी नजीकच्या बॅकेत / नागरी सुविधा केंद्र मार्फत पिक विमा संरक्षण घ्यावे.

तसेच विमा सहभाग नोंदवताना आपला मोबाईल क्र. इलेक्ट्रॉनिक साक्षांकन करावा जेणेकरुन विमा सहभागाबाबतची माहीती एस.एम.एस द्वारे शेतकऱ्यांना दिली जाईल. सी.एस.सी. केंद्र / बँक यांनी शेतकऱ्यांकडून तलाठ्यामार्फत साक्षांकीत केलेला सातबारा देण्याचा आग्रह करु नये सी.एस.सी. केंद्र चालकांनी विना शूल्क विमा भरुन घ्यावा. कर्जदार शेतकऱ्यांनी विमा योजनेत सहभागी होणे अथवा न होणे बाबत कर्ज खाते असलेल्या बँक शाखेत विहीत नमून्यात स्वतंत्र घोषणापत्र सादर करणे बंधनकारक आहे. जे कर्जदार शेतकरी घोषणापत्र देणार नाहीत त्या सर्व शेतकऱ्यांचा योजनेमध्ये सहभाग बंधनकारक समजला जाईल.

इच्छुक शेतकऱ्यांनी अधिक माहितीसाठी आपल्या तालुक्यातील तालुका कृषि अधिकारी कार्यालयात, एसबीआय इन्शुरन्स विमा कंपनी मार्फत कार्यरत पिक विमा सुविधा व सल्ला केंद्रामध्ये, नजीकच्या बँकेत किंवा www.pmfby. gov.in या संकेतस्थळावरून माहिती उपलब्ध करुन घेता येईल.

तसेच शेतकऱ्यांनी आपल्या पिकाची ई-पिक पाहणी या मोबाईल प वर अचूक माहिती नोंदवावी. विमा संरक्षित पिक व ई-पिक पाहणी मध्ये नोंदवलेले पिक यात तफावतीचा मुद्दा उद्भवल्यास ई-पिक पाहणी मध्ये नोंदवलेले पिक अंतिम ग्रहीत धरण्यात येईल याची सर्व शेतकऱ्यांनी नोंद घ्यावी.





श्री.तिरूपती ट्रेडींग कंपनी

शिवाजी चौक, निलंगा, जि. लातूर

जैन ठिबक सिंचन

जैन स्प्रिंकलर

जैन पी.व्ही.सी.पाईपचे

-: अधिकृत विक्रेते:-

प्रो. गुणवंत गायकवाड हलगरकर

फोन:-दु. २४२४६३, मो.९४०४६८२९९९

छोटी झेरॉक्स मशीन व प्रिंटर विक्री

कलर प्रिंट/झेरॉक्स

B/W प्रिंट/झेरॉक्स

जम्बो झेरॉक्स/प्रिंट

डिझाईनिंग/पासपोर्ट फोटो

रिफीलींग/टोनर/फोटो पेपर

लॅमिनेशन मशिन व मटेरिअल

झेरॉक्स मशीनचे अधिकृत विक्रेते :

बोरा झेरॉक्स

व्यापारी धर्मशाळा, महात्मा गांधी चौक, लातूर.

9673344777



SINCE 1972

माळवदकर एजन्सीज

सावेवाडी, लातूर

mo. 9422656522

सर्व प्रकारच्या फर्निचरचे उत्पादक व विक्रेते


# डिजिटल इंडिया वीक २०२३ २५ ते ३१ जुलै दरम्यान साजरा होणार

लातूर : आगामी डिजिटल इंडिया वीक २०२३, हा दिनांक २५ जूलै २०२३ ते दिनांक ३१ जूलै २०२३ दरम्यान होणार आहे. भारतातील अभूतपूर्व डिजिटल क्रांती साजरी करण्याच्या अनुषंगाने भारत सरकारकडून डिजिटल इंडिया वीक २०२३ चे आयोजन करण्यात येत आहे. डिजिटल इंडिया वीक - २०२३ चे आयोजन करण्यामागे भारत सरकारमार्फत सद्यस्थितीतील वापरात असलेली आणि अद्यावत नवीन तंत्रज्ञान सर्वांसमोर प्रदर्शित करणे तसेच स्टार्टअप उद्योगासाठी सहयोग आणि व्यवसायाच्या नवनवीन संधी शोधण्यासाठी पुढील पिढीला प्रेरणा देणे हा उद्देश आहे.

या कार्यक्रमाचे उद्दिष्ट डिजिटल इंडिया मोहिमेअंतर्गत केलेल्या डिजिटल उपक्रम आणि उपलब्धी साजरे करणे आणि डिजिटली सशक्त समाजाला प्रोत्साहन देणे हा आहे. जास्तीत जास्त सहभाग आणि सहभाग सुनिश्चित करण्यासाठी या सर्व बाबींचा लाभ सर्वांना मोठ्या प्रमाणात घेता यावा, याकरिता सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सर्वांसाठी नोंदणी करण्याची सुविधा https://www.nic.in/diw2023-reg/ या लिंकद्वारे एनआयसीमार्फत उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

या उपक्रमात नोंदणी करून सक्रिय सहभाग घ्यावा, असे जिल्हा सूचना-विज्ञान अधिकारी, एन आय सी , जिल्हाधिकारी कार्यालय लातूर यांच्यामार्फत आवाहन करण्यात आले आहे.

डिजिटल इंडिया वीकच्या साजरीकरणाच्या उद्घाटनाप्रसंगी, पंतप्रधान यावेळी उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या हस्ते होणाऱ्या उद्घाटन कार्यक्रमासाठी, नॅशनल इन्फॉर्मेटिक्स सेंटर, जिल्हाधिकारी कार्यालय लातूर यांनी जिल्हा प्रशासनाच्या मदतीने पंतप्रधानांच्या भाषणाचे थेट प्रक्षेपण आणि जास्तीत जास्त सहभागासाठी कार्यक्रमाचा प्रचार करण्याची व्यवस्था करण्याचे नियोजन केले आहे.

या कार्यालयाला प्राप्त झालेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार, महाविद्यालये, शासकीय कार्यालये इत्यादींतील स्थानिक सभागृहांचा समावेश करणे अपेक्षित आहे. जेणेकरून संबंधित प्रशासनाने हाती घेतलेले उल्लेखनीय डिजिटल उपक्रम प्रदर्शित करण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून यांचा वापर करता येऊ शकेल.

या सप्ताहात नियोजित कार्यक्रमांची माहिती कार्यालयामार्फत व्यापक प्रसिद्धीही करण्यात येणार आहे. सप्ताहामधील दुसऱ्या दिवसापासून विविध डिजिटल उपक्रम प्रदर्शित करण्यासाठी विविध भौतिक सत्रे आयोजित करण्याची योजना आहे. डिजिटल इंडिया कार्यक्रम सप्ताह उत्सवाचा एक भाग म्हणून, विशिष्ट सत्रांसाठी तसेच तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ञ, प्राध्यापक उपलब्ध करून दिली जाणार आहेत. रविवार वगळता दिवस दोन पासून सुरू होणाऱ्या सर्व दिवसांमध्ये प्रत्येकी एक तास कोणत्याही आयटीशी (IT) संबंधित विषयांचे वितरण, प्रस्तुत करण्यासाठी संस्था, कॉलेज, ऑफिसमधील प्राध्यापक, वक्ते, तज्ञांच्या सहभागाच्या मार्गदर्शनाने विद्यार्थी आणि सहभागींना सध्याच्या आयटी (IT) तांत्रिक बाबी देखील अद्यतनित होतील. तसेच डिजिटल इंडिया वीक दरम्यान, रविवार, दिनांक ३० जूलै, २०२३ वगळता सर्व दिवस वेबकास्ट, व्हीसी-आधारित सत्रांद्वारे (= प्रत्येकी १ तास) केंद्रीकृत सत्रे देखील उपलब्ध असतील. सर्व कॉलेज, संस्थेतील विद्यार्थी सहभाग त्यांच्यासाठी आगाऊ आयटी (IT) ज्ञान माहित करून घेण्यासाठी फायदेशीर ठरू शकतो.

# वैज्ञानिकांचा आदर्श घेऊन नवीन वैज्ञानिक घडावेत-प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड

लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.५ जुलै २०२३ रोजी जैवतंत्रज्ञान मंचच्या वतीने वैज्ञानिक 'जॉन हॉवर्ड नॉर्थ्रोप' यांची १३२ वी जयंती साजरी करण्यात आली.वैज्ञानिकांच्या वाढदिवसानिमित्त त्यांनी केलेल्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून अभिवादन करण्याचा हा उपक्रम दयानंद विज्ञान महाविद्यालयातील जैवतंत्रज्ञान विभाग आपले कर्तव्य मानून राबवत आहे.याच निमित्ताने विद्यार्थ्यांना संशोधकांमुळे प्रेरणा मिळेल व विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात कार्य करून स्वतः बरोबरच महाविद्यालयाचेही नावलौकिक करतील असे उद्दिष्ट समोर ठेवून हा उपक्रम सुरू केला आहे.

कार्यक्रमाची सुरुवात दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड यांनी वैज्ञानिकाच्या प्रतिमेस वंदन करून केली.कार्यक्रमाची प्रस्तावना प्रा. श्रीनिवास कुलकर्णी यांनी केली. यांच्याबद्दल प्रा.स्वरूप गावकरे यांनी जॉन हॉवर्ड नॉर्थ्रोप यांबद्दल थोडक्यात माहिती सांगितली.

प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड यांनी यावेळी जैवतंत्रज्ञान विभागातर्फे अविरतपणे राबविण्यात येणाऱ्या या कार्यक्रमाचे कौतुक केले अशा वैज्ञानिकांचा आदर्श घेऊन नवीन वैज्ञानिक आपल्यातून घडावेत अशा शुभेच्छा दिल्या. जॉन हॉवर्ड नॉर्थ्रोप हे एक अमेरिकन बायोकेमिस्ट होते, ज्यांनी जेम्स बॅचेलर समनर आणि वेंडेल मेरेडिथ स्टॅनली यांच्यासमवेत १९४६ चे रसायनशास्त्रातील नोबेल पारितोषिक जिंकले होते. हा पुरस्कार या शास्त्रज्ञांच्या पृथक्करण, क्रिस्टलायझेशन आणि एन्झाइम्स, प्रथिने आणि विषाणूंचा अभ्यास यासाठी देण्यात आला. नॉर्थ्रोप हे कॅलिफोर्निया विद्यापीठ, बर्कले येथे बॅक्टेरियोलॉजी आणि मेडिकल फिजिक्स, एमेरिटसचे प्राध्यापक होते. प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमात जैवतंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ.के.एस.गोमारे, सूक्ष्मजीवशास्त्र विभागप्रमुख डॉ.राहुल मोरे, डॉ.एम.ए.कराळे,डॉ.दीप्ती ढेरे, प्रा.एस. एस. धुतेकर, प्रा.पी.ए.सोनसाळे,डॉ.फिरदोस बिरादार, प्रा.अवंती बीडकर, प्रा.मयूरी जाधव, प्रा.शीतल पाटील, प्रा.संध्या टेकाळे,अनुराधा इंगळे, प्रा.श्रीनिवास कुलकर्णी तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी विशाल टर्फे, श्रावण माळी,बी.एल.शिंदे,चिते,हलसे, महादेव सूर्यवंशी, संतोष सूर्यवंशी यांची उपस्थिती होती.